




दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS





दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २२२ वा ● सोमवार ०१ जानेवारी २०२४ ● पाने ६ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 222 | Date : 01/01/2024 | blow :Monday | Page 6 | Price 4


## लढाई १ जानेवारी १८१८ ची...



लढाईत आता धरणी कापली
इंग्रजांची फौज संपली
पेशवा आता नाचू लागला
आनंदात उधळू लागला
मुठ उरली महारांची
जणू जंगलाच्या राजाची
मेंढ्याच्या झुंबडीवर
वाघ आता डरकाळी फोडली
घातला असा घाला
डाव सारा उलटून पडला
घमंड पेशवा जागेवर संपला
करुनी प्रहार पेशव्यांवरती
इतिहास नवा रचिला
महार म्हणजे ताकद
हा पाया नवा घातीला
करुनी नमन तुजला
हे महार सैनिका
विजय स्तंभा समोर माथा
बाबासाहेबांचा झुकला ।

**– शुभदा प्रशांत जैनजांगडे**

## नगर–दौंड महामार्गावर ट्रक आणि झायलो कारचा अपघात

नगर : अहमदनगर– दौंड महामार्गांवर ट्रक आणि झायलो कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात ३ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर ८ जण गंभीर जखमी झाले आहेत. अहमदनगर–श्रीगोंदा रस्त्यावर झायलो कार आणि ट्रक समोरासमोर आल्याने हा भीषण अपघात झाला.जुने वर्ष सरत असताना या भीषण अपघातात तिघांचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या अपघातात काळाने शेख कुटुंबियांवर घाला घातला. या भीषण अपघातात शेख परिवारातील १३ वर्षाच्या दोघांसह ३० वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. शाबाज शेख, गाजी बांगी आणि लुजैन शेख असे या अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे आहेत. त्याशिवाय, अपघातात ८ जण जखमी झाले आहेत. जखमीपैकी काहींना दौंड तर काहीना श्रीगोंदा येथील खासगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. शेख कुटुंबिय श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव येथील दर्गाच्या दर्शनासाठी कल्याणवरून आले असल्याची माहिती आहे..या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# कृष्णविवर अभ्यास मोहिमेने ‘इस्रो’ची नववर्षांची नांदी..!



श्रीहरिकोटाः भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) सोमवारी नवीन वर्षांचे स्वागत पहिल्या ‘एक्स–रे पोलरिमीटर उपग्रहा’च्या (एक्सपोसॅट) प्रक्षेपणाने करणार आहे. त्यासाठी संबंधित सर्व यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. या मोहिमेद्वारे कृष्णविवरांसारख्या (ब्लॅक होल) खगोलीय निर्मितीमागील रहस्य उकलण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. ऑक्टोबरमधील गगनयान चाचणी वाहन ‘डी १ मिशन’च्या यशानंतर हे प्रक्षेपण करण्यात येत आहे. या मोहिमेचे आयुष्य सुमारे पाच वर्षांचे असेल. ही भारताची पहिली समर्पित ‘पोलरिमीटर’ मोहीम आहे. त्यामुळे कृष्णविवरांच्या रहस्यमय बाबींचा अभ्यास करण्यास मदत होईल.

ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपक (पीएसएलव्ही) –‘सी ५८’ आपल्या साठाव्या मोहिमेत प्रमुख अभ्यास उपग्रह ‘एक्सपोसॅट’सह दहा अन्य उपग्रह प्रक्षेपित करणार आहे. हे उपग्रह पृथ्वीच्या निम्न कक्षेत सोडले **। पान २ वर**

### मोहिमेची वैशिष्ट्ये

*** कृष्णविवरांसारख्या (ब्लॅक होल) खगोलीय निर्मितीमागील रहस्य उकलण्याचा प्रयत्न**

*** उपग्रह प्रक्षेपक प्रमुख अभ्यास उपग्रह ‘एक्सपोसॅट’सह दहा अन्य उपग्रह प्रक्षेपित करणार**

*** खगोलीय स्त्रोतांकडून होणाऱ्या क्ष किरण उत्सर्जनाचा अभ्यास करणारा हा ‘इस्रो’चा पहिला समर्पित वैज्ञानिक अभ्यास उपग्रह**

*** श्रीहरिकोटा येथे इस्रोच्या एक्स–रे पोलरीमीटर उपग्रह (एक्स–पीओसॅट) वाहून नेणाऱ्या पीएसएलव्ही–सी५८ या प्रक्षेपकाच्या उड्डाणाची तयारी सुरू आहे.**

# पुण्यातील कोरेगाव भीमामध्ये २०६ वा शौर्य दिनाचा उत्साह, अभिवादनासाठी भीम अनुयायांची गर्दी

कोरेगाव : कोरेगाव भीमा या ठिकाणी आज २०६ वा शौर्य दिन साजरा होत आहे. शौर्य दिनाच्या पार्श्र्वभूमीवर कोरेगाव भीमा विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी नागरिकांना मोठी गर्दी केली आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकाळी विजय स्तंभाला अभिवादन केले. आज दिवसभरात लाखो आंबेडकर अनुयायी या ठिकाणी अभिवादन करण्यासाठी येणार आहेत. मंत्री चंद्रकांत पाटील , प्रकाश आंबेडकर , केंद्रीय मंत्री रामदास आठवले, आमदार जितेंद्र आव्हाड हे नेतेही कोरेगाव भीमा या ठिकाणी येणार आहेत. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झालेल्या कोरेगावच्या लढाईचा दिवस अनुयायांकडून शौर्य दिन म्हणून साजरा केला जातो.

१ जानेवारी १९२७ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विजय स्तंभास भेट दिली होती. या शौर्य दिनानिमित्त विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी राज्यभरातून





लाखो आंबेडकर अनुयायी आज येणार आहेत. पहाटेपासूनच विजय स्तंभास अभिवादन करण्यासाठी लोकांची मोठी गर्दी पहायला मिळत आहे. २०६ वर्षांपुर्वी कोरेगाव भीमा इथं झालेल्या लढाईत महार आणि इतर समाजातील सैनिकांच्या पराक्रमुळे ब्रिटिशांनी पेशव्यांच्या सैन्याचा पराभव केला होता. १ जानेवारी १९२७ ला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी या विजय स्तंभास भेट देऊन हा इतिहास पुढे आणला. तेव्हापासून या ठिकाणी शौर्य दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली.

कोरेगाव इथे १ जानेवारी १८१८ मध्ये एक ऐतिहासिक लढाई झाली. ही लढाई इंग्रज आणि पेशव्यांमध्ये झाली होती. महार समाजातील सैन्याच्या जोरावर इंग्रजांनी पेशवाईविरुद्ध युद्ध पुकारले होते. हे युद्ध इंग्रजांनी जिंकल्यानंतर त्यांनी लढाईच्या स्मरणार्थ कोरेगाव भीमा येथे विजय स्तंभ बांधण्यात आला. दरवर्षी कोरेगाव भीमा येथे १ जानेवारी रोजी विजयस्तंभ शौर्य दिन अनुयायांकडून मोठ्या उत्साहात साजरा होतो. महार सैनिकांच्या सन्मानार्थ येथील विजय स्तंभाला मानवंदना देण्यासाठी दरवर्षी १ जानेवारीला महाराष्ट्रासह देशभरातून आंबेडकर अनुयायी यांच्यासह इतरही लाखोंच्या संख्येनं लोक या ठिकाणी येतात.

सोहळ्यास उपस्थित राहू न शकणाऱ्या नागरिकांना घरबसल्या सोहळा पाहता यावा यासाठी सह्याद्री वाहिनीवरून १ जानेवारी रोजी सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत सोहळ्याचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. सकाळी ६:३० वाजता मान्यवर पाहुणे विजयस्तंभास अभिवादन करतील. ७:३० वाजता समता सैनिक दल, महार रेजिमेंट सेवानिवृत्त सैनिक आणि सैनिक दलातर्फे मानवंदना दिली जाईल. सकाळी ९:३० वाजता ‘डॉ.बी.आर. आंबेडकर विज्डम बुकफेअर’चे उद्घाटन होईल, अशी माहिती बार्टीच्यावतीने देण्यात आली आहे.

## केंद्र सरकारकडून आणखी एका संघटनेवर बंदी; भारतविरोधी कारवाई करत असल्याचा ठपका

नवी दिल्ली : केंद्र सरकारने जम्मू–काश्मीरमधील आणखी एका संघटनेवर कारवाई केली आहे. काश्मीमधील फुटीरतावादी पक्ष ’तेहरिक–ए–हुर्रियत’ला दहशतवादी संघटना घोषित करण्यात आले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ही माहिती दिली आहे. अमित शाह म्हणाले की फुटीरतावादी पक्ष तेहरीक–ए–हुर्रियत ला बेकायदेशीर कृत्य प्रतिबंध कायद्यानुसार ’बेकायदेशीर संघटना’ घोषित करण्यात आले आहे.

केंद्र सरकारकडून काश्मिरी फुटीरतावादी संघटनांवर सातत्याने कारवाई सुरू आहे. काही दिवसांपूर्वी काश्मीर खोऱ्यातील आणखी एका संघटनेवर बंदी घालण्यात आली होती. २७ डिसेंबर रोजी सरकारने मुस्लिम लीग जम्मू काश्मीर (मसरत आलम गट) या संघटनेवर बंदी घातली होती. दहशतवादी संघटना म्हणून केंद्राने जाहीर केले होते. या संघटनेचा नेता मसरत आलम भट हा भारतविरोधी कारवायांमध्ये गुंतला असल्याचा आरोप आहे. पाकिस्तानच्या समर्थनात त्याने काश्मिरी खोऱ्यात कारवायादेखील केल्यात.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, ’तेहरिक–ए–हुर्रियत’ दहशतवादी कारवायांमध्ये सामील आहे आणि जम्मू–काश्मीर भारतापासून वेगळे करणे हा त्याचा उद्देश आहे. ’तेहरिक–ए–हुर्रियत’ही काश्मीरमध्ये फुटीरतावादाला प्रोत्साहन देत होती. या संघटनेकडून इस्लामी राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न सुरू होता. भारतविरोधी कारवायांमध्ये गुंतलेल्या संघटनांचा तात्काळ उच्चाटन करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

# पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून विविध विकास कामांची पाहणी

## रांजणी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे काम ठेकेदाराने त्वरित पूर्ण करावे : पालकमंत्री चंद्रकांत पाटील

पंढरपूर/प्रतिनिधीः जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विविध विकासात्मक कामासाठी मोठ्या प्रमाणावर निधी शासकीय यंत्रणांना उपलब्ध करून देण्यात येतो. निधीतून पूर्ण करण्यात आलेल्या व सुरू असलेल्या कासेगांव येथील वनविभागाच्या तसेच रांझणी येथील विविध विकास कामांची पाहणी उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी केली. तसेच रांझणी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे काम अपुर्ण असल्याने ते काम त्वरित





पुर्ण करावे अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी त्यांच्या त्याच्यासमवेत आमदार समाधान आवताडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, उपवन संरक्षक धैर्यशिल पाटील, अतिरिक्त मुख्याधिकारी संदीप कोहिनकर,उपमुख्याधिकारी सर्जेराव मिरकले, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार , सहा. जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जि.प. बांधकामचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.नरळे, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, वनपरिक्षेत्र अधिकारी चैताली वाघ यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दिलेला निधी व्यवस्थितपणे संबंधित विकास कामावर खर्च होतो किंवा नाही यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते, त्याच अनुषंगाने पंढरपूर तालुक्यातील कासेगाव व रांझणी येथील विविध विकास कामांची पाहणी केली असून, रांजणी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे काम अपूर्ण आहे. तरी संबंधित। **पान २ वर**

# स्वच्छ माझा महाराष्ट्र अभियान राज्यभर राबवणार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

मुंबई : प्रदूषण कमी करण्यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासाबरोबरच पर्यावरण संवर्धनाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी झाडे लावण्याबरोबरच स्वच्छता अभियान प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. मुंबई शहरात राबवले जाणारे स्वच्छता अभियान आता राज्यात सर्वत्र राबविण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी आज ‘स्वच्छ माझा महाराष्ट्र’ या महास्वच्छता अभियानास प्रारंभ केला. त्यावेळी ते बोलत होते. गेटवे ऑफ इंडिया येथे झालेल्या या कार्यक्रमाला शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आमदार सदा सरवणकर, माजी आमदार राज पुरोहित, उद्योगपती नादीर गोदरेज, मुंबई महापालिका आयुक्त आय. एस. चहल, अतिरिक्त आयुक्त अश्र्विनी भिडे, डॉ. सुधाकर शिंदे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

**महास्वच्छता अभियान राज्यभर**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, ठाणे महापालिकेच्या कार्यक्षेत्रात स्वच्छता अभियानास प्रारंभ केला. त्यानंतर हे अभियान मुंबई शहरात राबवले. या अभियानाचा परिणाम खूप चांगला आहे. त्यामुळे हे अभियान आता राज्यात सर्वत्र राबविण्यात येणार आहे. स्वच्छ माझा महाराष्ट्र अभियानासाठी एक कार्य प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्यानुसार आपल्या कार्यक्षेत्रात स्वच्छता अभियान राबविण्यात यावे. या अभियानात लोकांना सहभागी करून घेण्यात यावे.

**स्वच्छता अभियान लोकचळवळ झाली**

मुंबई शहरात सुरू केलेल्या या अभियानात शाळा, महाविद्यालय विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, ज्येष्ठ नागरिक संघ, विविध प्रतिष्ठान सहभागी होत आहेत. यामुळे या अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप येत आहे. मुंबई डीप क्लीन ड्राईव्हचे एक मॉडेल तयार झाले आहे, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी आज येथे सांगितले.

**मुंबईत अर्बन फॉरेस्ट संकल्पना राबविणार**

विकास प्रकल्पामुळे तोडाव्या लागलेल्या झाडांचे पुनर्रोपण



करणार आहे. मुंबईत रिकाम्या जागेवर झाडे लावली जाणार आहेत. मुंबई शहरात अर्बन फॉरेस्ट संकल्पना राबविण्यासाठी विचार सुरू आहे. ठाणे शहरातील कोपरी परिसरापासून गायमुख पर्यंत ग्रीन पॅच तयार केला जात आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितले.

**स्वच्छता कर्मचारी मुंबईचा खरा हिरो**

मुंबई शहरातील स्वच्छता कर्मचारी खरा हिरो आहे. कारण ते सकाळी लवकर उठून कामाला सुरुवात करतात. मुंबई स्वच्छ ठेवतात. या कर्मचाऱ्यांच्या वसाहती स्वच्छ ठेवण्यासाठी आमचा प्रयत्न आहे. सफाई कर्मचारी यांना विमा सुविधा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. सफाई कर्मचारी यांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबवा, लोकप्रतिनिधींना सूचना

मुंबई शहरात राबवले जाणारे स्वच्छता अभियान आता राज्यात सर्वत्र नेले जाणार आहे. हे अभियान आपल्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे राबवा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विविध लोकप्रतिनिधींना केले. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दूरदृश्य प्रणालीव्दारे आमदार विद्या ठाकूर,। **पान २ वर**

# संपादकीय

## समान शिक्षा व्हावी..

लोकशाहीचे आधारस्तंभ व मंदिर समजल्या जाणाऱ्या संसदेत अचानक घुसखोरी होऊन संसदेत गोंधळ उडतो ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. अचानक दोन जणांनी नवीन संसद भवनाची सुरक्षा भेदल्याने देशभरात खळबळ उडालीच, सोबतच याचे पडसाद जगातही दिसून आले. जे सहा युवक संसद भवनाच्या परिसरात किंवा आत गेले त्यांना कर्नाटकातील भाजपचे खासदार प्रताप सिन्हा यांच्यामार्फत पास दिल्याचे सांगितले जाते. प्रताप सिन्हा म्हणतात की, आपण या तरुणांना ओळखत नव्हतो. यामुळे प्रश्न उद्भवतो की आपण जर या युवकांना ओळखत नाही तर एवढ्या मोठ्या लोकशाहीच्या मंदिराचे पास का देण्यात आले? यामुळे संसद भवनात किंवा परिसरात तरुणांमार्फत जे ही घृणीत कृत्य घडले त्याचा पहिला दोषी पास देणारा खासदारच आहे, असे मी समजतो. कारण खासदारांनी पास दिलाच नसता तर असे कलंकित कृत्य घडलेच नसते. सोबतच यात सुरक्षा यंत्रणेचीसुध्दा मोठी चूक दिसून येते. सुरक्षा यंत्रणेमार्फत जर त्या तरुणांची कसून तपासणी झाली असती तर त्यांना जागीच पकडून कारवाई करता आली असती व हा अनुचित प्रकार टाळता आला असता. त्यामुळे संसद भवनाच्या परिसरात तरुणांमार्फत जे धक्कादायक कृत्य झाले त्याचे मुख्य दोषी पास देणारे खासदारच आहेत व नंतर सुरक्षा यंत्रणा आहे. त्यामुळे सरकारने पास देणाऱ्या खासदाराला ताबडतोब निलंबित करायला पाहिजे. सोबतच येणाऱ्या निवडणुकीतही त्याला निवडणूक लढण्याचा अधिकार नसावा, पण इथे उलटे होताना दिसत आहे. जे या घुसखोरीच्या चौकशीची मागणी करीत आहेत, त्यांनाच निलंबित करण्यात आले. त्यात पुन्हा ही संख्या थोडी थोडकी असती तर समजण्यासारखे होते, पण ही संख्या लक्षणीय असल्यामुळे देशातील जनतेला आश्चर्याचा धक्का बसला. पाच राज्यांच्या झालेल्या विधानसभांच्या निवडणुकांमध्ये तीन राज्यांमध्ये भाजपची सरशी झाली. त्यामुळे त्यांचा विश्वास वाढला, पण त्याचबरोबर कर्नाटकातील काँग्रेसच्या विजयामुळे विरोधकांच्या पंखात जे बळ आले होते ते ओसरले. त्यात पुन्हा पाच राज्यांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसने जी एकला चलोची भूमिका घेतली, त्यामुळे विरोधकांच्या एकीची बेकी झाली आहे. त्यामुळे बेरीज होण्याच्या जागी वजाबकी होताना दिसत आहे. विरोधकांच्या या बेकीमुळे सत्ताधाऱ्यांनाही त्यांची किंमत वाटेनाशी झाली आहे. त्यामुळे एखाद्या शिक्षकाने वर्गात दंगा करणाऱ्या मुलांना वर्गाच्या बाहेर काढण्याची शिक्षा द्यावी तसे चित्र सध्या संसदेत दिसत आहे.

# शौर्याचे नाव भिमा कोरेगाव

कोरेगाव भिमा चे नाव जरी उच्चारले तरी मनुवादी, विषमतावादी, आणि विकृती ला संस्कृती माणणाऱ्या, माणसा माणसात भेद करून माणसाला माणसापासून दुर करून त्यांच्या मानसिक गुलामीचा व अज्ञानाचा फायदा घेऊन स्वतः ची झोळी भरणाऱ्या लोकांच्या छातीत कळ निघते. त्याला कारणही तसेच आहे. जगाच्या पाठीवर अनेक लढाया होऊन अनेक सत्ता पालट झाले असतील असतील. परंतु कोरेगाव भिमा ची लढाई ही सत्ता पालट होण्यासाठी नव्हे तर समता प्रस्थापित करण्यासाठी होती, कोरेगाव भिमा ची लढाई ही अन्याय अत्याचार करणाऱ्यांच्या विरोधातील होती. माणसाने माणसावर अमानुष अत्याचार करून, भेदभाव करून माणसाला नैसर्गिक हक्क अधिकारापासून दुर ठेऊन माणसाला हिन समजणारी निच माणसिकता निर्माण केली होती. हे सर्व कोरेगाव भिमाच्या लढाईने मोडीत काढून जागतिक विक्रम केला. आणि म्हणुनच जगाच्या पाठीवर अनेक लढाया झाल्या असतील परंतु लढाईचा विजय मोठ्या आनंदाने आणि जनसामान्य माणसात साजरा होतो ती लढाई म्हणजे कोरेगाव भिमा. कोणत्याही गोष्टी चा अतिरेक झाला तर तर त्या गोष्टी नष्ट केल्या जातात. याचेच ज्वलंत व शौर्याचे प्रतिक म्हणजे कोरेगाव भिमा येथे उभा असलेला दिमाखदार विजयस्तंभ. विषमतावादी व निच आणि मानवी गुलामीची शिकवन देणाऱ्या मनुस्मृती ला कायदा समजून येथे विषमता खुप वाढली होती. माणसासोबत माणसाने हिन वागुन विषमता पसरवणाऱ्या निच माणसिकतेचे लोक स्वतः ला श्रेष्ठ समजत होते. ज्यांच्या कडे नैतिकता नव्हती, समता नव्हती, लोकांना अज्ञानी ठेऊन, चुकीच्या गोष्टी रचुन, हक्क अधिकार नाकारून लोकांना सर्वांगीण विकासा पासुन दूर ठेऊन स्वतः ला श्रेष्ठ समजणारे किती निच विचाराचे असतील याची कल्पना येते. पेशव्यांचे माणसाला हिन समजून अन्याय अत्याचार वाढले होते. सार्वजनिक ठिकाणी, नैसर्गिक साधनसंपतीचा वापर ही मानसांना करण्यास बंदी होती, सोबत जेवने बसने सोडा पण एकमेकांना स्पर्श करणे येथे पाप अपवित्र समजले जायचे. आणि माणसाच्या स्पर्शाने अपवित्र झालेल्या माणसाला पवित्र करण्यासाठी गाईच्या मुताचा वापर केला जात होता. ज्यांना ह्या गोष्टी पटत असतील ते किती मानसिक गुलाम आणि जे ह्या गोष्टी करत असतील ते किती निच व बुद्धीहीन असतील हे दिसून येते.

विषमता, भेदभाव, अस्पृश्यता, किंवा पेशव्यांचे अन्याय अत्याचार हे कोणत्याही एका जातीवर होते हे म्हणने निव्वळ मुर्ख पणाचे आहे. वर्णाचे रूपांतर जातीत करून जेवढ्या जाती निर्माण केल्या त्या सर्व जातीचे शोषण, त्या सर्व जातीवर अन्याय अत्याचार, त्या सर्व जातीबद्दल द्वेष आणि हिन भावना पेवशव्यांना होतीच. इतिहासाचे पान उकलून डोळसपणे आपण आपण इतिहास बघितला तर पेशव्यांनी व त्यांच्या पुर्वजांनी राजा महाराज यांनाही हीन व तुच्छ माणून स्वतः ला श्रेष्ठ समजून इतरांवर अन्याय अत्याचार करून स्वतः ची झोळी भरून घेतली. प्रत्येक जातीवर अन्याय अत्याचार करून विषमतेची जोपासना करणाऱ्या लोकांनी शिक्षणाचा व प्रगतीचा हक्क स्वतः कडे ठेवून इतरांना शिक्षण, ज्ञान व नैसर्गिक हक्का सोबत सामाजिक हक्क अधिकार नाकारले होते. लिहण्याचा अधिकार त्यांच्या कडेच असताना त्यांनी इतिहासाची तोडफोड करून वैचारिक दिवाळखोरी च्या माध्यमातून स्वतः च्या बाबतीत कर्तृत्व नसताना इतिहास लिहून ठेवला. ब्राम्हणेतर लोकांनी पराक्रम केले, इतिहासात सामाजिक शैक्षणिक कार्यात खुप मोठे योगदान देऊन सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आयुष्य खर्ची घालून लोकांना महान बनवले. परंतु लिहण्याचा हक्क नैतिकता नसलेल्या लोकांकडे असल्याने सत्य लिहणज म्हणजे धर्मद्रोह करणे होय. म्हणून इतिहासाची धुळधान करून, इतिहासात लोकांवर अन्याय अत्याचार करून, सर्व सामान्य लोकांचे जगणे असह्य करणाऱ्या पेशवाईने जरा अतिच केले होते. शिवशाई मध्ये एकोप्याने आनंदाने राहणारे लोक, संभाजी महाराजांची हत्या करून शिवशाई संपवून पेशवाई लागु केली आणि लोकांवरचे अन्याय अत्याचार खुपच वाढले.

अजून ही एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे पेशव्यांचे अन्याय अत्याचार एका जातीवर नव्हते तर सर्व जातीवर होते. पेशव्यांचा अन्याय अत्याचार वाढतच होता. इतिहासामध्ये पेशव्यांनी राजांवरही अन्याय अत्याचार करून त्यांचाही अवमान केला. माणसाला माणूस म्हणून वागणूक मिळत नव्हती आणि पेशवे राजांना व राजांच्या वंशजांना ही मानसन्मान देत नव्हते म्हणून लोकांच्या मनात पेशव्यां बद्दल चिड निर्माण होऊन अन्याय अत्याचाराचा बदला घेण्याची इच्छा तर मनात ठासून भरली होती. फक्त वाट बघत होते ते योग्य वेळेची. ब्रिटीश सैन्यात असलेल्या बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडीला संधी व वेळ चालुन आली. ३१ डिसेंबर १८१७ रोजी ब्रिटिश आणि पेशवे यांचे युद्धाची घोषणा झाली. ब्रिटीशांकडून बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री




तुकडी लढणार होती. परंतु ब्रिटीशांच्या विरुद्ध लढणारे पेशवे हे तिस हजार सैन्यासह चाल करून येत आहेत. आणि बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडी मध्ये केवळ ८३४ च सैनिक असल्याने ब्रिटीशांना आपली हार दिसून आली आणि ऐन वेळेवर ब्रिटिश अधिकाऱ्यांने युद्धातून माघार घ्यायचे ठरवले. बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडी मध्ये वेगवेगळ्या जातीचे लोक होते परंतु बहुसंख्य महार जातीचे लोक होते. ब्रिटीशांच्या बॉम्बे नेटिव लाइट इन्फेंट्री तुकडी नेतृत्व कॅप्टन फ्रान्सिस स्टाँटन हे करीत होते. परंतु जेव्हा त्यांनी माघार घेतली तेव्हा त्यांच्या सोबत ३३४ सैनिक माघारी आले. परंतु पेशवाईशी लढाई करण्याची संधी आल्याने आपण माघार न घेता अन्याय अत्याचार मुळासकट नष्ट करण्याची हिच सुर्वण संधी समजून बहुतांश महार असलेल्या तुकडीचे नेतृत्व सिदनाक महाराने करून पाचशे सैन्याच्या जोरावर पेशव्यांशी लढाई करण्याचा निर्णय घेऊन.

माघे हटण्यास नकार दिला. पाचशे सैन्याचे सिदनाक महार हा नेतृत्व करतो हे ऐकून पेशव्यांच्या तिस हजार सैन्यातील दोन हजार सैन्याने मनोमन हार मानून पळ काढला. मग खरी लढाई झाली ती २८०० पेशवे विरुद्ध पाचशे बहुसंख्य महार लोकांमध्ये. पाचशे शुरविर योद्ध्यांना पेशव्यांचे सैन्य किती आहे हे दिसत नव्हते. पेशव्यांनी अन्याय अत्याचार करून जिवन जगने किती असह्य केले, त्याच्या वेदना किती आहेत, आणि येणाऱ्या पिढीला पेशवाईचे चटके बसु नाही म्हणून पेशव्यांचा खात्मा केल्याशिवाय आनंदाचे दिवस येणार नाही. हेच विचार मनात ठासून भरल्याने २८हजार पेशव्यांच्या विरोधात पाचशे शूरवीर लढले. फक्त लढलेच नाहीत तर विजय मिळवला. फक्त विजयच मिळवला नाही तर

पेशवाई संपवुन टाकुन खऱ्या अर्थाने मनुस्मृती चे दहण केले. कारण मनुस्मृती नुसार ब्रम्हहत्या पाप मानले जायचे, ब्रामणाच्या समोर उभे राहणे पाप मानले जायचे परंतु १ जानेवारी १८१८ रोजी पेशवाई संपवून अन्याय अत्याचारी पेशव्यांचे तुकडे तर पाडलेच आणि पुन्हा पेशवा निर्माण होणार नाही अशी भितीच निर्माण करून खऱ्या अर्थाने पेशव्यांचे अर्थात मनुस्मृती चे वर्चस्व नाकारून जागतिक शौर्य सिद्ध केले. ब्रिटीशांनी माघार घेऊन नही केवळ अन्याय अत्याचाराचा बदला घेण्याण्या भावनेतून झालेल्या लढाईत पाचशे लोकांचा विजय झाली नाही तर पाचशे शुरविर लोकांनी क्रांती केली. मराठा साम्राज्याचे रक्षण करण्याचे नाटक करणाऱ्या पेशव्यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या हत्येनंतर साधा अंत्यसंस्कार ही करू नये म्हणजे पेशवे छत्रपती घराण्याशी किती बेईमानी करून छत्रपतींचाही अवमान करत होते हे अनेक संदर्भावरून दिसून येते. छत्रपती संभाजी महाराज यांचे अंत्यसंस्कार एका महार माणसाने करून महाराजांची समाधी बांधावी, व त्याच महार लोकांनी पेशवाई संपवून खऱ्या अर्थाने छत्रपती संभाजी महाराज यांना वंदन करावे. यापेक्षा मोठा सन्मान छत्रपतींचा कोणता असू शकतो? महारांचा पराक्रम हा खरचं जागतिक ऐतिहासिक आहे. म्हणून या शौर्याचे महत्व लोकांच्या समोर उभे रहावे. लोकांना शौर्याची प्रेरणा मिळावी म्हणून ब्रिटीशांनी भिमा नदीच्या काठी, कोरेगाव या ठिकाणी जयस्तंभ उभा करून त्या शुरविरांना मान वंदना दिली. लढाई मध्ये जखमी झालेल्या सैन्याच्या उदरनिर्वाहासाठी वेगवेगळ्या ठिकाणी सुमारे २६५ एकर जमीन देऊन त्यांचा सन्मान करून स्तंभाची देखभाल करण्याची जबाबदारी त्यांच्या वर दिली. भिमा कोरेगाव चा स्तंभ आजही आम्हाला आठवण करून देतो की तुम्ही लढाऊ आहात, तुम्ही स्वाभिमानी आहात, तुम्ही शुरविर आहात, तुम्ही इतिहासच नाही तर भुगोलही बदलु शकता. हि लढाई सत्तेसाठी नसली तरीही समतेसाठी, स्वाभिमानासाठी, अन्याय अत्याचार दुर करण्यासाठी होती म्हणून इतर लढायांपेक्षा सर्वात मोठी व सर्वात शौर्याची लढाई म्हणून इतिहासात नोंद आहे.

आणि या शौर्य स्तंभाला दरवर्षी शौर्य लोक वंदन करून आजही शुरविरांचे वंशज शुरच आहेत म्हणून १ जानेवारी दरवर्षी मोठ्या उत्साहाने शौर्यदिन म्हणुन साजरा केला जातो. म्हणून आज जर शौर्याचे नाव विचारले तर सर्वांच्या समोर फक्त भिमाकोरेगाव चे नाव येते. आणि हिच ओळख शुरविरांची आहे.

पाचशे शुरविरांच्या शौर्याला वंदन

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## कृष्णविवर अभ्यास मोहिमेने

जातील. चेन्नईपासून पूर्व भागात सुमारे १३५ किलोमीटरवर असलेल्या अवकाश केंद्रातून नवीन वर्षांच्या पहिल्या दिवशी सकाळी नऊ वाजून दहा मिनिटांनी होत असलेल्या प्रक्षेपणासाठी २५ तासांची उलटगणती सुरू झाली आहे.

'इस्रो'च्या मते, अवकाश आधारित ध्रुवीकरण मापनांद्वारे खगोलीय स्त्रोतांकडून क्ष किरण उत्सर्जनाचा अभ्यास करणारा हा 'इस्रो'चा पहिला समर्पित वैज्ञानिक अभ्यास उपग्रह आहे. 'इस्रो'व्यतिरिक्त, अमेरिकन संस्था 'नासा'ने डिसेंबर २०२१ मध्ये 'सुपरनोव्हा' स्फोटाचे अवशेष, कृष्णविवरांमधून उत्सर्जित होणाऱ्या कणांचे प्रवाह आणि इतर खगोलीय घटनांवर असाच अभ्यास केला होता.

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील ..

ठेकेदारांनी पुढील एका महिन्याच्या आत दवाखान्याचे काम पूर्ण करावे अन्यथा कारवाई करण्यात येईल, असे निर्देश त्यांनी दिले. सार्वजनिक विकास कामे करताना ती गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे.तसेच विकास कामांसाठी मंजूर निधी मुदतीत खर्च करण्याबाबतच्या सूचना दिल्या.तसेच वन विभागाने औषधी वनस्पतींची लागवड करावी जेणेकरून त्यातून उत्पन्न मिळाल्याने इतर विकास कामासाठी त्या निधीचा वापर करता येईल असे पालकमंत्री पाटील यांनी यावेळी सांगितले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी कासेगाव (ता.पंढरपूर) येते अटल आनंद घन वन प्रकल्पाअंतर्गत तयार करण्यात आलेल्या रोपवनाची व रोपवाटिकेची पाहणी केली.रांझणी (ता.पंढरपूर) येथे जिल्हा नियोजन च्या निधीतून रांझणी ते चळे या रस्त्याची, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वर्ग खोल्यांची पूर्ण झालेल्या कामांची पाहणी केली. तसेच पशुवैद्यकीय दवाखाना मुख्य इमारत व प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत, कर्मचारी निवासस्थान या ठिकाणी सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी पालकमंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते कासेगाव रोपवनामध्ये वृक्षारोपणही करण्यात आले. विकास कामांची पाहणी करताना संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाबाबत माहिती घेतली. तसेच मार्गदर्शक सूचनाही यावेळी त्यांनी दिल्या.

पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच इतर राज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. भाविकांसह स्थानिक नागरिक तुळशी वृंदावन पाहण्यासाठी येत असतात परंतु सद्यस्थितीत तुळशी वृंदावन बंद असल्याने ते लवकरात लवकर सुरू करावे तसेच कासेगांव विसावा येथे सभामंडप बांधण्यासाठी तात्काळ प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना आमदार समाधान आवताडे यांनी दिल्या.

जिल्हा नियोजन समितीमार्फत ग्रामीण रस्ते विकास योजनेअंतर्गत रांझणी ते चळे या १.५०० किलोमीटरच्या रस्त्यासाठी १० लाख ७७ हजार रुपये खर्च झाले असून रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. प्राथमिक शाळा इमारत बांधकामासाठी २१ लाख ६२ हजार रुपये खर्च झाले असून इमारत बांधकाम पूर्ण झाले आहे. तसेच पशुवैद्यकीय दवाखाना मुख्य इमारत बांधकामासाठी ४० लाखांचा निधी मंजूर असून, आतापर्यंत ३१ लाख ४० हजार रुपये खर्च करण्यात आले असून काम सुरू आहे. प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, कर्मचारी निवासस्थान, संरक्षक भिंत बांधकाम करण्यासाठी ४ कोटी १९ लाख २८ हजार रुपये इतका निधी मंजूर असून आतापर्यंत ०२ कोटी ३३ लाख ३६ हजार रुपयाचा निधी खर्च झाला असून काम प्रगतीपथावर असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी यावेळी सांगितले. मौजे कासेगाव (ता.पंढरपूर) येथील जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निकृष्ट वनाचे पुनर्वनीकरण, अटल आनंद घन वन प्रकल्पाअंतर्गत रोपवनात विविध रोपांची व औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे. यामुळे जैवविविधतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे उपवन संरक्षक धैर्यशील पाटील यांनी सांगितले.

## स्वच्छ माझा महाराष्ट्र अभियान ..

आशिष शेलार, यामिनी जाधव, भारती लव्हेकर, प्रकाश सुर्वे, मंगेश कुडाळकर, दिलीप लांडे, कालिदास कोळंबकर यांच्याशी संवाद साधला. तत्पूर्वी महापालिका आयुक्त आय. एस. चहल यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी मुंबई शहरात राबवल्या जात असलेल्या डीप क्लीन ड्राईव्हबाबत माहिती दिली. यावेळी स्वच्छता कर्मचारी संदीप पवार, शीला जाधव, मच्छिंद्र सावंत, स्वप्नील शिरवाळे, अर्चना मोरे यांचा सत्कार करण्यात आला. अतिरिक्त आयुक्त सुधाकर शिंदे यांनी आभार मानले. त्यानंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी स्वच्छता कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी वीर माता जिजाबाई भोसले उद्यान, सदानंद धवन उद्यान, भोईवाडा येथे भेट देऊन सफाई कर्मचारी व मुलांशी संवाद साधला.

# पंढरपूर उपविभागातील पोलीस पाटील पदाकरिता २९५ उमेदवार उत्तीर्ण : प्रांताधिकारी गजानन गुरव

## मुलाखत दि ८ ते १२ जानेवारी २०२४ या कालावधीत

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर उपविभागातील मोहोळ व पंढरपूर या तालुक्यातील एकूण ६९ गावातील पोलीस पाटील पदाकरिता भरती प्रक्रिया सन २०२३ रबविण्यात आली होती.

त्यापैकी ५३ गावातून पोलीस पाटील पदाकरिता एकूण ३५५ अर्ज प्राप्त झाले तर ३४८ उमेदवार लेखी परीक्षेसाठी पात्र झाले होते. या परीक्षेमध्ये २९५ उमेदवार उत्तीर्ण झाले असून पात्र उमेदवारांच्या मुलाखती दि. ८ ते १२ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये घेण्यात येणार असल्याची माहिती प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी दिली.

पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा रविवार दिनांक ३१ डिसेंबर २०२३ रोजी पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय या ठिकाणी परीक्षेसाठी ३४२ उमेदवार हजर होते व ६ उमेदवार गैरहजर होते. परीक्षा सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळेत घेण्यात आली. परीक्षेची वेळ पूर्ण होताच १२ वाजून ४० मिनिटांनी उमेदवारांकरीता उत्तर सूची परीक्षा केंद्रावर प्रसिद्ध करण्यात आली. उत्तर सूचीमध्ये कोणाला काही आक्षेप असल्यास त्याबाबत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत हरकती नोंदवण्यासाठी वेळ देण्यात आली होती.

या वेळेमध्ये कोणीही लेखी हरकत नोंदवलेले नाही. त्यामुळे सायंकाळी ५.३० वाजता लेखी परीक्षेमध्ये मिळालेले उमेदवार निहाय गुण प्रसिद्ध करण्यात आले. ८० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात आली होती. ही परीक्षा पास होण्यासाठी एकूण गुणाच्या ४५ टक्के गुण मिळणे आवश्यक होते. परिक्षेत ज्या उमेदवारांना ३६ किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त झाले असतील असे उमेदवार या परीक्षेमध्ये पास असल्याचे घोषित करण्यात आले. या परीक्षेमध्ये २९५ उमेदवार पास व ४७ उमेदवार नापास झाले आहेत.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर या ठिकाणी परीक्षा कालावधीत भेट देऊन आढावा घेतला व परीक्षेची व्यवस्था, नियोजन चोखपणे केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या परीक्षेसाठी एकूण २० समावेशक ५ पर्यवेक्षक १३ शिपाई २ पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आले होती .

परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी तहसीलदार सुशील बेल्हेकर, तहसीलदार सचिन मुळीक यांनी कामकाज पाहिले या संपूर्ण प्रक्रियेचे अध्यक्ष व परीक्षा केंद्र प्रमुख म्हणून उपविभागीय अधिकारी गजानन गरव यांनी कामकाज पाहिले. पात्र उमेदवारांच्या मुलाखत दि ८ ते १२ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये घेण्यात येणार असून, त्याबाबत उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल असे प्रांताधिकारी गुरव यांनी सांगितले.

# ज्योतिबा पारखे यांना राज्यस्तरीय लहुजी साळवे समाज गौरव पुरस्काराने सन्मानित

अक्कलकोट/प्रतिनिधीः नांदेड येथे बिसेफ प्रणित ६,राज्यस्तरीय अण्णाभाऊ साठे साहित्य संमेलन नांदेड येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते तथा फकीरा दलाचे सोलापूर जिल्हा प्रमुख ज्योतिबा उर्फ जय भाऊ पारखे यांना राज्यस्तरीय लहुजी साळवे समाज गौरव पुरस्कार शाल, स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ, अण्णाभाऊ साठे समग्र साहित्य खंड ग्रंथ, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आला. यावेळी मुख्य निमंत्रक एचपी कांबळे व संमेलन अध्यक्ष संजय मांजरेकर सह मोठ्या संख्येने नेते पदाधिकारी लेखक कवी कार्यकर्ते समाज बांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# नव्या परंपरांचे निर्माते..! महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ; प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे



भारतात पहिल्यांदाच बीएसएनएलच्या सहकार्याने एऑन प्लेच्या प्लॅटफॉर्मवर माहिती आणि मनोरंजनाचा खजाना बरोबरच सर्व भाषेतील वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, डिजीटल मिडीया एका क्लिकवर आणण्याचा प्रयोग यशस्वी करून तरूणांसाठी नव्या डिजीटल रोजगाराचे दालन खुले केले. तर महाराष्ट्रासह तीन राज्यात पंचवीस हजारापेक्षा जास्त सदस्य संख्या असलेल्या संघटनेला विविध उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक चेहरा दिला. पारंपारिक आर्थिक धोरण बदलून वृत्तपत्रांनी उत्पादन खर्चावर आधारीत विक्री किंमत ठेवावी आणि केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणार्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजार रूपयाची सूट द्यावी यासाठी राज्यात जनजागृती करत पत्रकारांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी लढा उभारला. याची दखल घेवून एबीपी माझा वृत्तवाहिनीने महाराष्ट्राचे अनमोल रत्न या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मान केला आहे. तर लोकमत मिडीया ग्रुपने आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम अवार्ड दुबई येथे प्रदान करून दोन्ही माध्यम समुहांनी वसंत मुंडे यांचा कार्याचा गौरव केला.

परळी वैजनाथ तालुक्यातील लाडझरी येथुन शिक्षणासाठी अंबाजोगाईत आलेल्या वसंत मुंडे यांनी शालेय जीवनातच रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना एका पत्रकाराच्या माध्यमातून न्याय मिळवून दिला. महाविद्यालयात असतानाच विभागीय वृत्तपत्रात काम करण्याची संधी मिळाली. तेव्हा ऊसतोड मजुरांबरोबर जावून त्यांच्या समस्यांवर प्रदिर्घ लेखमाला लिहिली आणि चळवळीतील कार्यकर्त्यांचे लक्ष वेधले घेतले. याच मालिकेवर त्यांना समर्थन संस्थेने शिष्यवृत्तीही जाहिर केली.

मुंडे यांना कमी वयातच राज्यस्तरावरील दैनिकात संधी मिळाली आणि त्यांच्या लेखणीचा दबदबा राज्यभर निर्माण झाला. बीड जिल्ह्यातील राजकारण, समाजकारणाचे वेगळेपण नेमकेपणाने हेरून मुंडे यांनी सातत्याने मांडले. चांगल्या विषय भरभरून लिहिले. दुष्काळ व नापीकी मुळे काही वर्षांपूर्वीपासून शेतकरी आत्महत्यांचा विषय चर्चेत असतो. मात्र काही शेतकरी मात्र हतबल न होता परिस्थितीला हारवून उपलब्ध साधनांमधून नवीन प्रयोग यशस्वी करता.अशा शेतकर्यांच्या यशोगाथा मांडल्या, आणि शब्द शिवार पुस्तक शब्दबध्द केल. यातुन परिस्थितीत झगडणार्या शेतकर्यांना प्रेरणा मिळावी,समाजातील नकारात्मक भावना कमी व्हावी त्यामागचा उद्देश.पुस्तकाच्या प्रस्तावनेतच वसंत मुंडे यांच्या लेखणीचे कौतुक करताना हिवरे बाजारचे सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, पद्मश्री श्री.पोपटराव पवार लिहितात – 'अनेक नवनवीन प्रयोगांची दखल श्री.वसंत मुंडे ह्यांनी घेतली आहे. नवीन तंत्रज्ञान आपण स्वीकारावं, असं शेतकर्यांना वाटू लागल्याचं चांगलं चित्र त्यांनी मांडलं आहे. हे बदल टिपणं, असे प्रयोग करणार्यांना प्रोत्साहन देणं, ही आश्वासक पत्रकारिता म्हणता येईल.'

समाजाचे प्रश्न मांडणार्या पत्रकारांच्या अडचणींचे काय? यावर कोणी बोलण्यास तयार नसते. वृत्तपत्रांचे व्यवस्थापन आणि कर्मचारी कोणत्या परिस्थितीला तोंडे देऊन काम करतात, पत्रकारांना मिळणारा मान सन्मान त्यांच्या प्राथमिक गरजा पूर्ण शकतो का? माध्यमांची वाढत्या संख्येमुळे या क्षेत्रात काम करणार्या घटकांचे काही प्रश्न आहेत ही जाणीवच कोणी करून घेत नाही. हे लक्षात घेवून आपले प्रश्न आपण मांडायला हवेत या भूमिकेतून वसंत मुंडे यांनी संघटनेच्या व्यासपीठावरुन वृत्तपत्र आणि पत्रकारांचे प्रश्न मांडायला सुरूवात केली. सामान्यांचे प्रश्न मांडणार्या माध्यमांचे उघडपणे पहिल्यांदाच प्रश्न मांडले जावू लागल्याने वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर पत्रकारांचे मजबूत संघटन उभा राहिले. महाराष्ट्रासह तीन राज्यात संघटनेचे पंचवीस हजाराहून अधिक सभासद निर्माण झाले. आपले प्रश्न कोणीतरी पोडतिडकीने मांडतो आहे हे लक्षात घेवून वृत्तपत्र व इतर माध्यमातील ज्येष्टांनीही मुंडेंच्या नेतृत्वाला पाठबळ दिले. संघटनेच्या प्रदेशाध्यक्षपदाची धुरा स्विकारल्यानंतर मुंडेंनी राज्यभरात वृत्तपत्राचे अर्थकारण आणि पत्रकारांच्या समस्या यावर स्वतंत्र सहा विभागीय अधिवेशने घेवून जनजागृती केली. माध्यमात काम करणार्यांना आर्थिक पातळीवर सक्षम आणि उचित सन्मान मिळाला पाहिजे. वृत्तपत्रांनी पारंपारिक आर्थिक धोरण बदलून उत्पादन खर्चावर आधारीत वृत्तपत्राची विक्री किंमत ठरवावी असा आग्रह धरला. परिणामी राज्यभरातील चारशेपेक्षा अधिक वृत्तपत्रांनी आपल्या किमती दुप्पट करण्याचा निर्णय घेतला. तर सरकारने कर्मचार्यांना पाच दिवसाचा आठवडा करून दोन सुट्ट्या दिल्या आहेत. वृत्तपत्र मात्र वर्षातून केवळ पाच ते सहाच वेळा सुट्या घेतात.कर्मचार्यांचीही हिच परिस्थिती. सद्यस्थितीत माहितीची अनेक माध्यमे उपलब्ध झाल्यामुळे वृत्तपत्रांनीही आता आठवड्याला एक सुट्टी घेण्याची कल्पना मांडून यातील आर्थिक गणित आणि होणारा फायदाही मांडला. याचे काही वृत्तपत्रांनी स्वागत केले. तर वृत्तपत्र खरेदी करणार्यांना केंद्र सरकारने आयकरात वार्षिक पाच हजार रूपयाची सुट द्यावी असा प्रस्तावही त्यांनी दिला आहे. राज्य सरकारने राज्यातील ग्रामपंचायतींना वार्षिक आराखड्यात वृत्तपत्र खरेदीसाठी दहा हजार रूपयाची तरतूद करावी ही मागणीही त्यांनी लावून धरली आहे. वृत्तपत्र क्षेत्राला आर्थिक पातळीवर आत्मनिर्भर करण्यासाठी त्यांचा प्रयत्न देशपातळीवर चर्चेत आहे. कोरोनाच्या काळात पत्रकारांसाठी राज्यभर मदत कक्ष सुरू करून काही कोटी रूपयांच्या जमा केलेल्या जिवनावश्यक वस्तू गरजुंपर्यंत पोहोचविण्याचे काम केले.संघटनेच्या रूग्णवाहिका प्रशासनाकडे दिल्या. रक्तदान शिबीरे घेवून एका दिवसात १६०० पिशव्या रक्त संकलीत केले. नैसर्गिक आपत्तीत लोकसहभागातून आपदग्रस्तांना मदत



उभा केली. विविध सामाजिक उपक्रम राबवून संघटनेला सामाजिक चेहरा दिला आहे. शासनाच्या अधिस्विकृती पत्रिका समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना वसंत मुंडे यांनी हे पद मिरवण्यासाठी नाही तर पत्रकारांना न्याय देण्यासाठी आहे हे कामातून दाखवून दिले. विभागातल्या सर्व जिल्ह्यामध्ये पत्रकारांबरोबर खुली चर्चा घेतली आणि अधिस्विकृती पत्रिका मिळण्यासाठीच्या अडचणीही समजून घेत कोटा पध्दत बंद करून तालुका पातळीवरील पत्रकारांना अधिस्विकृती देण्याचा निर्णय घेतला. ज्येष्ट पत्रकारांना त्यांच्या घरी जावून अधिस्विकृती पत्रिका देण्याचा निर्णय राज्यभर नावाजला गेला. मुद्रीत माध्यमात काम करताना बदलत्या काळानुसार डिजीटल क्रांतीमुळे या क्षेत्रात आता प्रयोग केला पाहिजे हे लक्षात घेवून मुंडे यांनी मागील तीन वर्षाच्या अथक परिश्रमातून भारतात पहिल्यांदाच बीएसएनएलच्या सहकार्याने एऑन प्लेच्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर सर्व भाषेतील वृत्तपत्रे, टीव्ही चॅनेल्स, डिजीटल मिडीया एका क्लिकवर आणला आहे. माहिती आणि मनोरंजनाबरोबरच या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून तरूणांना डिजीटल रोजगाराची नवी संधीही उपलब्ध केली आहे. डिजिटल बाजारपेठ अनेक नवीन संधी निर्माण करत असल्याने या क्षेत्रात ही वसंत मुंडे यांनी नवा प्रयोग करून आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखवली आहे.

राज्यव्यापी पत्रकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष, गावपातळीपासून शहरापर्यंत संघटनेचे व्यापक जाळे निर्माण करताना राज्यभर त्यांनी अनेक संस्था आणि माणसे जोडली, उभी केली त्यामुळे त्यांचा राज्यभर मोठा चाहता वर्ग आहे. लोकशाहीतील प्रमुख घटक असलेल्या वृत्तपत्रांचे अर्थकारण आणि त्याला बळकटी आणण्यासाठी त्यांनी केलेला प्रयत्न, बदलत्या काळानुसार डिजीटल क्रांतीत 'एऑन प्ले'ची निर्मिती, या त्यांच्या सततच्या कामाकडे माध्यमांचे आणि सर्वसामान्यांचे लक्ष वेधून घेतले नाही तर नवलच! वृत्तपत्रात शक्यतो इतर संस्थेमधील व्यक्तीचा कामाचा गौरव करण्याची परंपरा नाही. मात्र लोकमता मिडीया ग्रुपने आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'एक्सलन्स इन सोशल जर्नालिझम' अवार्ड देऊन दुबईत वसंत मुंडेंचा सन्मान केला. तर महाराष्ट्रातील आघाडीची 'एबीपी माझा वृत्तवाहिनी'ने यावर्षी मानाच्या 'महाराष्ट्राचे अनमोल रत्न' या पुरस्कारासाठी निवड झाली. या दोन्ही नामांकीत माध्यमसमूहांनी पुरस्काराच्या माध्यमातून श्री.वसंत मुंडेंच्या कार्याचा गौरव केला आहे.

पत्रकारितेच्या प्रदीर्घ वाटचालीत श्री.वसंत मुंडे यांनी आपल्या व्यवसायाला आणि व्यवसायातील सहकार्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी उभा केलेला लढा आणि निडरपणे सामान्यांचे प्रश्न मांडताना घेतलेली भूमिकेने विश्वासार्हता निर्माण केली आहे. अशा या लढवय्या पत्रकार कार्यकर्त्याला वाढदिवसाच्या मनःपूर्वक सदिच्छा!

**प्रा.डॉ. प्रभू गोरे, संपादक, छत्रपती संभाजीनगर.**

# पत्रकारांच्या समस्यांची जाणीव असणारे नेतृत्व डॉ.विश्वासराव आरोटे




पत्रकारिता करताना निस्वार्थीपणाची भावना अंगीकारून पत्रकारांच्या समस्यांचे निराकरण करून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पत्रकार संघाचा अमृतवेल वाढविण्याचे काम व ग्रामीण पत्रकारांना व्यासपीठ निर्माण करून देण्याचे काम करून देणारे नेतृत्व म्हणजे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ.विश्वासराव आरोटे हे होय.

चितळवेढे (ता. अकोले जि. अहमदनगर) या छोट्याशा डोंगर कुशीतील आणि प्रवरामाईच्या तिरावर असलेल्या गावी त्यांचा जन्म झाला. परिस्थिती बेताचीच असल्यामुळे प्राथमिक शिक्षण जन्मगावी पूर्ण केले. त्यानंतर माध्यमिक शिक्षण मा. मधुकरराव पिचड माध्यमिक विद्यालय राजुर येथे पूर्ण केले तर महाविद्यालयीन शिक्षण अकोले येथील महाविद्यालयात पूर्ण केले परिस्थिती सामान्य असल्यामुळे शिक्षण घेत असताना सकाळी चितळवेढे येथून दूध घेऊन यायचे नंतर वर्तमानपत्र वाटण्याचे काम करायचे वर्तमानपत्र वाटत असताना वेळ मिळेल तेव्हा ते वाचत असायचे असा नित्यक्रम सुरू झाला. वर्तमानपत्र वाचता वाचता पत्रकारीतेची झालेली ओळख आज त्यांना उच्च पदावर घेऊन गेली.

ग्रामीण भागात वृत्तपत्र पोचवून ग्रामीण भागातील खप वाढवायचा असेल तर त्या भागातील समस्या समजून घेऊन वृत्तपत्रात त्याची मांडणी होणे आवश्यक आहे याची जाणीव विश्वासरावांना झाल्यानंतर त्यांनी ग्रामीण भागातूनच आपल्या पत्रकारीतेचा श्रीगणेशा केला आणि ग्रामीण भागातील समस्या आपल्या लेखणीच्या माध्यमातून मांडून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला .आणि ध्येयवेडी स्वप्ने उराशी बाळगून कर्तव्य करत राहिले यावेळी ग्रामीण भागातील वास्तव मांडताना अनेक अडीअडचणी आल्या परंतु मुळातच परंतु मुळातच अकोले तालुक्याला विचारांचा वारसा लाभलेला असल्यामुळे पत्रकारीता क्षेत्रातील अनेक ज्येष्ठ पत्रकारांशी त्यांची विचारसरणी जुळली. त्यातूनच मार्गदर्शनाची दिशा मिळत गेली .कतृत्व आणि नेतृत्व याचा सुरेख संगम अस्तित्वात आला. लेखणीला चालना देता देता ग्रामीण भागातील वास्तव मांडतांना व दैनिक गावकरी या वृत्तपत्रात काम करत असताना ग्रामीण भागातील पत्रकारांशी त्यांची नाळ जोडली गेली त्यातूनच ग्रामीण समस्यांची उकल त्यांनाच झाली. समस्या सोडवण्यासाठी काही तरी केले पाहिजे या उद्देशाने संघटन बांधणी सुरू केली बातमीदारीत्यांना मोठ्या पदावर घेऊन गेली. वार्ताहर म्हणूनअनेक वृत्तपत्रांमध्ये काम केल्या नंतर तालुका प्रतिनिधी आणि नंतर विभागीय कार्यालयाचे उपसंपादक म्हणून त्यांनी दैनिक गांवकरी'या उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिकाची जबाबदारी यशस्वीरीत्या पेलली. गांवकरीच्या माध्यमातून ग्रामीण भागाची, या भागातील ग्रामस्थांची विश्वासार्हता जपली. त्यांचे प्रश्न आपल्या लेखनीच्या माध्यमातून सातत्याने मांडले. पत्रकारीताकरत असतानाच ग्रामीण भागातील पत्रकारांशी देखीलत्यांची नाळ जोडली गेली. या पत्रकारांच्या समस्या त्यांना आपल्या समस्या वाटू लागल्या. या समस्या सोडविण्यासाठी काही तरी केले पाहिजे, असे सारखे वाटत होते. त्यांनी ग्रामीण भागात काम करणार्या पत्रकारांची मोट बांधली. सर्वांना बरोबर घेऊन अकोले तालुका ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना केली. या पत्रकार संघाच्या माध्यमातून त्यांनी पत्रकारांसाठी खर्या अर्थानेकार्य सुरु केले. हे काम करत असतानाच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचेराज्य संघटक संजय भोकरे यांचा संपर्क आला. दोघांचेही ध्येय एकच..पत्रकारांच्या समस्या सातत्याने मांडून त्यासाठी राज्यस्तरावर नव्हे तरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न करणे. ध्येय्य एकच



असल्याने या जोडगोळीने महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकारसंघाच्या माध्यमातून एकत्रित काम सुरु केले.

पत्रकारांसाठी चालविल्या जात असलेल्या या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी राज्यस्तरीय अधिवेशने घेतली. जिल्ह्यात, तालुक्यात विविध मेळावेघेतले. राज्यभरातीलसर्व जिल्ह्यातील पत्रकारांना या पत्रकार संघामध्ये सामावून घेतले. प्रत्येकाला संघाचे ओळखपत्र देऊन नवी ओळख दिली. सर्वच जिल्ह्यातील पत्रकारांचा विमा काढून खर्या अर्थाने पत्रकार संघ या पत्रकारांसाठी काम करतअसल्याचा विश्वास निर्माण केला. संघटनेच्या पदाधिकार्यांनी त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना अहमदनगर जिल्हाध्यक्ष आणि नंतरराज्य सरचिटणीस या पदावरकाम करण्याची संधी दिली. राज्य कार्यकारिणीवर काम करतानाचत्यांचे काम अतिशय जोमाने सुरु झाले. स्पर्धा परीक्षांबरोबरच क्रीडा, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणार्या गुणवंतांचा राज्यस्तरावर गौरव पत्रकारसंघाच्या माध्यमातून केला जात आहे. पंडीत श्रीश्रीरविशंकरजी यांनाही पत्रकार संघाने गौरविले आले. हलाखीची परिस्थिती असणार्या पत्रकारांना औषधोपचारासाठी व इतरगरजा भागविण्यासाठी पत्रकारसंघाच्या माध्यमातून आर्थिक मदत करण्याचा प्रामाणिक प्रयत्नही डॉ.विश्वासराव आरोटे यांनी केला आहे. अशा राज्यभरातून अनेक पत्रकारांना संघटनेने आर्थिक मदत केलीआहे.

माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, सुशिलकुमार शिंदे, समाजसेवक अण्णा हजारे, विधानसभेचे माजी सभापती हरिभाऊ बागडे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी उपमुख्यमंत्री दिवंगत आर. आर. पाटील, दिवंगत गोपीनाथ मुंडे, उपमुख्यमंत्री ना. अजित पवार, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, महसुल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शिवसेना प्रमुख उध्दव ठाकरे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, माजी मंत्री दिलीप वळसे, पद्माकर वळवी, रामराजे निंबाळकर, बबनराव पाचपुते, बाळासाहेब थोरात, राम शिंदे, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत दादापाटील, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आदींकडे त्यांनी सातत्याने पत्रकारांच्या विविध समस्या मांडल्या. पत्रकारांना संरक्षण मिळावे यासाठी संरक्षण कायदा व्हावा यासाठी ते नेहमीच आग्रही राहीले. पत्रकारांवर होणार्या हल्ल्यांचा निषेध करत आरोपींना अटक होईपर्यंत पाठपुरावा केला. ग्रामीण भागातील पत्रकारांनाही श्रमिक पत्रकारांप्रमाणेच ॲक्रीडीशन कार्ड मिळावे, एस. टी. बस तसेच रेल्वेसारख्या विविध सवलती मिळाव्यात, शासनानेत्यांचा आरोग्य विमा काढावा, पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलती द्याव्यात, पत्रकारांना निवासासी व्यवस्था उपलब्ध करावी या व अशा अनेक मागण्यांसाठी पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रामाणिक प्रयत्न विश्वासराव आरोटे करत आहेत. पत्रकारसंघाने याच मागण्यांसाठी मुंबई येथीलआझाद मैदानावर केलेल्या आंदोलनाची दखल राज्यपाल विद्यासागरराव यांनीही घेतली होती.

त्यांच्या कार्यकाळात अनेक पुरस्कार त्यांना मिळाले असुन त्यांनी केलेल्या कार्याचा तो सन्मान आहे.कोणताही पत्रकार असो त्यांना विश्वासराव माऊली म्हणुन संबोधतात त्यामुळे ते अधिक जिव्हाळ्याचे सबंध प्रस्थापीत करतात. त्यांना भरपुर आयुष्य व चांगले आरोग्य मिळो याच वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा!**शब्दांकन : नवनाथ जाधव प्रदेश प्रसिद्धी प्रमुख महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई**

# शेतकरी व कामगारासाठी उजनी धरणाचे पाणी एक वरदान आहे : सागर कल्याणशेट्टी

अक्कलकोट / गौतम बाळशंकरः उजनी धरणाचे पाणी कष्टकरी व शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे वरदान असल्याचे प्रतिपादन हन्नुर ग्रामपंचायतचे उपसरपंच युवा नेते सागर (दादा) कल्याणशेट्टी यांनी केले. हन्नुर येथील हरणा नदीच्या काठी उजनी धरणाचे पाणी आल्यानंतर पाण्याचे पूजन करीत असताना बोलत होते. उजनी धरणाचे पाणी आल्यामुळे अक्कलकोट विधानसभा क्षेत्रातील. शेतकऱ्याचे व कष्टकऱ्यांचे हरितक्रांतीचे स्वप्न पूर्ण करु आणि त्यासाठी सदैव आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण आखले आहे. विरोधकाच्या धोरणाला खत पाणी न घालता. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्या मार्गदर्शनाखाली अक्कलकोट विधानसभा क्षेत्रामध्ये उजनी धरणाचे पाणी आले आहे. खरा शेतकऱ्याचे हित पाहणारा पाणीदार आमदार म्हणून आमदार सचिन दादांचे नाव विधानसभा क्षेत्रात मध्ये कानाकोपऱ्यात पोहोचले आहे. यावेळी ग्रामपंचायत सदस्य पत्रकार गौतम बाळशंकर, माजी उपसरपंच शरणाप्पा हेगडे, राम परतनले,तंटामुक्ती अध्यक्ष सिद्राम पुजारी,ग्रामपंचायत सदस्य



शैलेश पाटील, घोडूभाई जमादार, अर्जुन जळकोट, सलीम मुल्ला,शरणाप्पा बंदिछोडे,महेश चितले,भरत टिकबरे, भीम भरमशेट्टी, आदी गावकरी कष्टकरी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या होणार...!

अक्कलकोट/प्रतिनिधीः राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या होणार... असे गेल्या वर्षभरापासून ऐकायला मिळत होते. परंतु अखेर बदल्या झाल्या असून, ह्या बदल्या केवळ ३० टक्क्याहून कमी झाल्याचे शिक्षक संघटनेच्या सूत्रांनी सांगितले. बदल्या पात्र-अपात्र चा मेसेज आला. तो शनिवारच्या मध्य रात्रो शिक्षकांना मेसेज आल्याने शिक्षकजन हडबडले..! गडबडले...!! राज्याच्या ग्रामविकास विभागाने ज्या एजन्सीला काम दिले, त्यांनी सावळा गोंधळ घातला. त्या कंपनीला वेळेचे भान न ठेवता पाठविलेल्या मेसेज बाबत तीव्र प्रतिक्रिया उमटले जात आहेत. जे खरोखरच बदल्यास पात्र आहेत अशा शिक्षकांना अद्यापही न्याय मिळाला नसल्याचे खंत व्यक्त करून बदली कामकाजा बाबत संघटनेच्या माध्यमातून न्यायालयाचे दरवाजे ठोठावणार असल्याचे शिक्षकातून बोलले जात असून, संपूर्ण शिक्षक बदल्या कार्यप्रणालीवर राज्यभरातील शिक्षकातून संताप व्यक्त केला जात आहे.

राज्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीच्या ६ वा टप्पा ऑनलाईन पद्धतीने कार्यान्वित करण्यात आले. बदली पोर्टलवर अर्ज दाखल करण्याची प्रक्रियामध्ये संवर्ग -१, व २ मध्ये अर्ज दाखल करताना सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणे, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी केल्यानंतर बदली पात्र संख्या निश्र्चित करण्यात आली. असे केवळ कागदोपात्रांचे घोडे नाचून सदरची प्रक्रिया पूर्ण केल्याचे दाखवून, राज्यातील मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी यांनी एजन्सीला हातास धरून संपूर्ण बदली प्रक्रिया केल्याचा आरोप शिक्षक संघटनातून होत आहे.

बदली प्रक्रिया ही पारदर्शक असणार असे छातीठोकपणे सांगणारे मात्र आता बघ्याची भूमिका घेत आहे. बदल्या कशा पद्धतीने होणार हे स्पष्ट केलेले असतानाही संपूर्ण फार्म एडीट करण्याची संधी न मिळाल्याने अनेक शिक्षकांच्या बदल्या झालेल्या नांही. याबाबत शिक्षकातून संतापजनक प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

बदली मध्ये सन २०२२ मध्ये अर्ज केलेल्या शिक्षकांना प्रथम प्राधान्य असल्याचे सांगण्यात आले. मात्र सन सन २०२२ मध्ये अर्ज केलेल्या शिक्षकांच्या फारच कमी बदल्या झालेल्या आहेत. अनेकांना या आंतर जिल्हा बदलीतून नव्या वर्षाच्या सोईच्या ठिकाणी मिळेल असी अशा शिक्षकांना होती. मात्र स्वप्न भंग झाल्याने संपूर्ण बदली कार्य प्रणालीवर राज्यभरातून टीका-टिपणी जोर धरत आहे. ज्या शिक्षक संघटनेने बदल्या बाबत पुढाकार घेतलेल्या होता त्यांनी आता शाबासकी मिळवून घेण्यापेक्षा योग्य असतानाही न झालेल्या शिक्षकांच्या बदल्या बाबत आवाज उठवावा अशी रास्त मागणी शिक्षकातून व्यक्त होत आहे.

राज्याचे शिक्षणमंत्री ना.दीपक केसरकर यांनी शिक्षकांच्या बदल्याबाबत ध्येय धोरण सांगण्यात आले. मात्र त्या पद्दतीने बदल्या झाल्या नाहीत. याबाबत फेर विचार करण्याची मागणी पुढे येत आहे. झालेल्या बदलीबाबत राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, ना.अजित पवार, ग्रामविकास मंत्री ना.गिरीश महाजन, शिक्षण व ग्रामविकास सचिव, उप सचिव, संचालक यांनी त्वरित लक्ष घालून खरोखरच अन्याय झालेल्या शिक्षकांना पुनश्र्च संधी देण्याची मागणी सिंधुदुर्ग ते गडचिरोली पर्यंतच्या शिक्षकातून होत आहे. याबरोबरच शिक्षक बदली करिता जिल्हा निहाय असलेला बिंदुनामावली (काष्ट फ़ॅक्टर) शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातून कायमस्वरूपी हटवण्याची मागणी देखील प्राधान्याने शिक्षकातून होत आहे.

ऑनलाइनपेक्षा ऑफलाईन बदल्या ह्या सर्व शिक्षक संघटना, मंत्री यांना मान्य असताना देखील कुणी ऑनलाइनचा आग्रह केला..? असा सवाल देखील शिक्षकातून उपस्थित केला जात असून, एकूणच झालेल्या शिक्षकांच्या बदल्याबाबत सध्या राज्यातील प्रत्येक शिक्षकातून नाराजीचा सूर व्यक्त होत आहे.

# महार सेनापती सिद्नाक महार आणि भीमा कोरेगावची लढाई... एक मानव मुक्तीचा लढा...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागवंशी पूर्वजांच्या इतिहासाची आठवण करून देताना बहिष्कृत भारत वृत्तपत्रात लिहितात... आमच्या बाप जाद्याने शिपाईगिरीच केली. तलवार भाला दानपट्टा तिरकमान या खेरीज कशाला हात लावला नाही. हे कोणास सांगावयास नको. आता जरी लेखणी हातात धरली आहे. तरी आपल्या आयुष्यात तलवार व बंदूक केव्हा हाती धरल्या नाहीत असे नाही. महार हे पट्टीचे लढवय्ये शूर पराक्रमी व सत्तशी इमान राखणारे होते.

भीमा कोरेगावची लढाई जगाच्या पाठीवर न भूतो न भविष्य अशी इतिहासाच्या पानावर नोंद झाली आहे. आधुनिक काळात भीमा कोरेगावची लढाई ही महारांच्या मर्दुकीची सनद ठरली, नागवंशी शूर महारांचा शौर्य आणि पराक्रमाचा इतिहास डॉ. बाबासाहेबानी उजेडात आणला. इतिहासाच्या पानात महारांचा इतिहास हरवला होता बाबासाहेबांनी शोध घेऊन आम्ही कोण आहोत याची जाणीव करून देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत भारत मधील एका अग्रलेखात लिहतात... आजचे अस्पृश्य लोक कोंबड्या बकऱ्याप्रमाणे बळी देण्यासारखे मेष राशीचे आहेत असे मला बिलकुल वाटत नाही त्यांच्या पूर्वजांची तर सिंह राशी होती याची साक्ष इतिहास देत आहे ते पुढे लिहितात पेशवाईला अखेरची मूठमाती देताना ज्यांचे पूर्वज धीरतार्थी पडले व ज्यांची नावे भीमा कोरेगावच्या विजयस्तंभ वर कोरून ठेवण्यात आली आहेत त्या वीरांची रास सिंह या राशी शिवाय दुसरी कोणती असू शकणार नाही.


इ. स.पूर्व १३ व्या शतकात राजा बहमनीच्या राज्यात सिद्नाक महार सेनापती होते. हे इतिहासाला आणि इतिहास कारांना विसरता येणार नाही. इतिहासाची पाने चालत असताना सिद्नाक महार सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील मौजे वेलंग येथील वतनदार होते. त्यांचे घराणे मूळ नाईक महारांचे घराणे होते. बहमनी राज्याच्या विघटनानंतर पाच शाह्या अस्तित्वात आल्या अहमदनगरची निजामशाही, विजापूरचे आदिलशाही, वऱ्हाडीची इमादशाही, गोवळकोंड्याची कुतूबशाही, बिदरची बिरीदशाही इ.स.१५ व्या शतकाच्या अखेरीस अस्तित्वात आल्या.इ.स.१६ व्या शतकात दुसऱ्या सिद्नाक महारानी अहमदनगरच्या निजामशाहीकडून मौजे वेळंग येथील महार वतनाच्या इनामी जमिनीच्या सनदा आणल्या. सरदार सिद्नाक महारचे सहकारी लखुजी जाधव, अंताजी खंडागळे, सुखाची गायकवाड मालोजीराजे भोसले, जजनपाल निंबाळकर हे सर्व मराठी सरदार लढाऊ पराक्रमी लढावू यौद्धे सरदार,सिदनाक महराचे सहकारी होते. मालोजीराजांचे पुत्र राजे शहाजीराजे आणि राणी जिजाऊचे लग्न लावून देण्याकरीता मध्यस्थी सरदार सिद्नाक महारानी केली यावरून निजामशाहीमध्ये सरदार सिद्नाक महार यांचा दरारा आणि इतर सरदारवर असलेल्या प्रभाव दिसून येतो.

सिद्नाक महाराचा नातू तिसरा सिद्नाक महार उर्फ सिद्नाक बाजी याने छत्रपती शिवाजी महाराजांना वाई प्रांतात जावळीच्या चंद्रराव मोरे स्वतःला राजा म्हणून घेत होता छत्रपती शिवाजी महाराजांना राजा मानायला तयार नव्हता, चंद्रराव मोरेचा पढाव करण्यासाठी इ.स. सन १६५६ मध्ये महाराजांनी चंद्रराव मोरे यांच्या जावलीवर स्वारी केली तेव्हा सेनापती सिदनाक बाजीने लष्करी मदती बरोबर घनदाट जंगलातून मार्ग दाखवण्याचे काम तसेच चंद्रराव मोरे बरोबर झालेल्या युद्धात शिदनाक बाजीने लढाईत शौर्य पराक्रमाने चंद्रारावाचा पराभव केला. छत्रपती शिवाजी महाराजांची शाबासकी मिळविली विश्र्वास संपादन केला. जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यावर विजापूरचा आदिलशहाचा सरदार अफजल खान स्वराज्यावर चालून आला तेव्हा महाराजांनी सरदार सिदनाक बाजीवर महत्त्वाची जबाबदारी सोपविली राजांनी बाजींना सांगितले सरदार अफजल खान कपट कारस्थानी फार दृष्ट आणि भेदी आहे. अफजलखान भेटी दरम्यान दगा फटका झाला तरी प्रतापगडाच्या पायथ्याशी तुम्ही तुमच्या सैन्यांला घेऊन थांबावे आणि गडावरून इशारा मिळताच मोघलांच्या सैन्यावर तुटून पडायचे. अफजलखानाने बरोबर आणलेल्या व्यापाऱ्यांची लूट करून स्वराज्याचा खजिना भरायचा ही जबाबदारी खऱ्या अर्थाने सरदार सिद्नाक बाजीने आपल्या शूर सैन्यांबरोबर पार पाडली.आणि महाराजांनी अफजलखानाचा वध करून स्वराज्यावरचे संकट परतावून लावले. बाजीचे स्वराज्याकरिता फार मोठे योगदान आहे. प्रतापगडाच्या भेटीदरम्यान पुन्हा एकदा महाराच्या प्रामाणिकपणाची साक्ष पटते. जीवा महार अफजलखानाच्या भेटीदरम्यान महाराजांबरोबर होता. सेयद बंडा अफजलखानाचा अंगरक्षक होता. महाराजांचा अंगरक्षक जिवा महार होता. महाराजांवरती सय्यद बंडाने वार केला त्यांचा हात हवेत कापणारा जिवा महार होता.( म्हणून महाराष्ट्रामध्ये म्हण प्रसिद्ध आहे. होता जिवा म्हणून वाचला शिवा)अफजलखान आपला कोतळा सावरत धावत असताना त्याचे मुंडके छाटणारा देखील जिवा महारच होता. परंतु त्या ठिकाणी स्वराज्याचा दुश्मन अफजलखानाचा वकील कृष्णाजी भास्कर कुलकर्णी या स्वराज्य भक्षकाने महाराजांवरती तलवारीने वार करण्याचा प्रयत्न केला. परंतु महाराजांनी चपलतेने त्यांनी या स्वराज्य बुडव्याला ठार केले.यावरून जिवा महार सिद्नाक महार यांचे स्वराज्य प्रति प्रामाणिकपणाची साक्ष पटते. आणि कृष्णाजी कुलकर्णीचा स्वराज्य प्रति महाराजांप्रती असलेला तिरस्कार लक्षात येतो. पुढे तिसरा सिद्नाकाला कृष्णनाक हा पराक्रमी मुलगा होता. वाई प्रांतात कळक येथे मराठा मोगल लढाईत स्वराज्याच्या कामी आला. याचे वशज कांबळे सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यात मौज वेलंग येथे वास्तव्याला आहेत.

पानिपत ते भीमा कोरेगाव सिद्नाक महाराजांचा इतिहास

सांगली येथील कळंबी गाव सिद्नाक महाराच्या शौर्याच्या आणि पराक्रमाची येशोगाथेची साक्ष देते आपल्याला कळंबी ठिकाणी आज देखील त्यांच्या स्मारकाच्या स्वरुपात पहावयास मिळते.पानिपतचे युद्ध म्हटलं तर आपल्याला पेशव्यांची बैल बुद्धीची आठवण होते. पहिले बाजीराव पेशवे दुसरे बाजीराव पेशवे शूर होते तेसेचं मनुस्मृतीचे पुजारी होते यात शंका नाही.परंतु पानिपतच्या युद्धामध्ये विश्र्वासराव आणि सदाशिवराव यांच्या नेतृत्वात अफघानी आक्रमक अहमदशाह अब्दाली १७६१ साली मध्ये युद्ध झाले. आणि या युद्धामध्ये महारांचे सेनापती सरदार पहिले सिदनाक पानिपतच्या युद्धामध्ये मारले गेले. पेशव्यांच्या ढसाल युद्ध नीतीचा परिणाम महार योद्धांना सोसावा लागला. पहिले सिद्नाक महान महार या योद्धाला पानिपतच्या युद्धामध्ये प्राण गमवावे लागले. पहिल्या सिद्नाक महाराजांचे महारांचे नातू महापराक्रमी दुसरे सेनापती सिद्नाक महार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे नातू छत्रपती संभाजी महाराज यांचे पुत्र छत्रपती दुसरे शाहू महाराज यांना औरंगजेब मृत्यूनंतर कैदेतून मुक्त केले. छत्रपती दुसरे शाहू महाराज महाराष्ट्रात दाखल झाले. स्वराज्य रक्षक ताराराणी आणि छत्रपती शाहू महाराज यांच्यामध्ये राजगादीवरून १७०७ वाद निर्माण झाला परिणाम युद्धात झाला मराठी सरदार, ,ताराराणी आणि शाहू महाराजांच्या बाजूने एकवटले परंतु निर्णायक भूमिका ही महापराक्रमी सेनापती सिद्नाक महार यांची होती सिदनाक छत्रपती शाहू महाराजांच्या बाजूने लढण्याचा निर्णय घेतला आणि शाहू महाराजांची ताकद वाढली. लढाईमध्ये छत्रपती शाहू महाराजांचा विजय झाला. दोन्ही बाजूने समजोता झाला. साताऱ्याची गादी शाहू महाराजांना मिळाली. कोल्हापूरची गादी ताराराणी यांनी आपल्याकडे कायम ठेवली.

युद्धात सेनापती सिद्नाक महार यांची प्रमुख भूमिका होती छत्रपती दुसरे शाहू महाराजांनी सेनापती सिद्नाक महाराना खुश होऊन सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील कळंबी गाव १७३९ साली इनाम दिले त्याचबरोबर कळंबी गावातील ९०० एकर जमीन इनाम दीली. शाहू महाराजांनी सरदारकीची वस्त्र अलंकार दीले. सिद्नाक महाराच्या मस्तकी शिरपेच चढविला. बहुमानाचे प्रतीक म्हणून मानचिन्ह आणि पालखीचा मान दिला. सिद्नाकाचा एवढा मोठा बहुमान छत्रपती शाहू महाराजांनी केला. तेव्हापासून दुसरे सिद्नाक महार (वाघमारे) हे सरकार इनामदार म्हणून सांगलीत तसेच महाराष्ट्रात ओळखले जाऊ लागले.



महापराक्रमी सेनापती सिद्नाक महार शूर पराक्रमी होते त्याचप्रमाणे त्यांचे नातू तिसरे सिद्नाक महार हे देखील महापराक्रमी योद्धा होते. तिसरे सिद्नाक महार हे महारसैन्याचे सेनापती होते आक्रमक स्वभाव तलवारबाजी मध्ये पटाईत सिद्नाक महाराच्या नावाने मोगलांच्या सैन्याला धडकी भरायची. याचा प्रत्येय आपल्याला १७९५ मध्ये निजाम आणि पेशवे यांच्यात झालेल्या खर्डाच्या लढाईत येतो. खर्ड्याच्या लढाईत श्रीमंत सवाई दुसरे माधवराव पेशव्यांचे सेनापती भाऊसाहेब पटवर्धन यांच्या नेतृत्वात युद्धाची तयारी झाली. पेशवाई काळात प्रत्येक जातीच्या सैन्यांची तळ वेगवेगले असायचे पानिपतच्या युद्धामध्ये अहमद अब्दालीने जाती जातीमध्ये असणारा जातिभेद हेरून पानिपतचे युद्ध जिंकले होते. सिद्नाक महाराचा तंबू हा मध्यभागी होता. काही ब्राह्मण उच्चवर्णीय यांनी सेनापती पटवर्धन यांच्याकडे यांच्याजवळ तक्रार केली तक्रार केली. पेशव्याने ब्राह्मण आणि मराठे सरदारांना सांगितले ही काही जेवणाची पगत नाही ही आहे शुराची संगत पंगत ज्याची तलवार खंबीर तो हंबीर समजले जाईल. युद्ध समोर होते. परंतु ही बातमी सिदनाक महाराना समजली सेनापती सिद्नाक म्हणाले महाराची तलवार चालते महार लढाईमध्ये सर्वात पुढे असतो. परंतु आमचा तळ आमचा गोट यांना चालत नाही. सरदार पाटणकर, सेनापती भाऊसाहेब पटवर्धन यांनी समजूत काढली. निजाम विरुद्ध पेशवा घनघोर युद्ध झाले या युद्धामध्ये निजामाचे सैन्य अफाट होते. घनघोर लढाई झाली सेनापती सिद्नाक महाराचे महार सैन्य निजामाच्या सैन्यावर तुटून पडले. परंतु एक निरोप सिद्नाका पर्यंत पोहोचला. सेनापती भाऊसाहेब पटवर्धनांना निजामाच्या सैन्यातील पठाणांनी वेडा दिला घेरले आहे. कोणत्याही क्षणी त्यांचा शीरछेद करण्यात येईल हे ऐकताच सिद्नाक महारानी आपला घोडा आपल्या सैन्यासह हर हर महादेव अशा आरोळ्या ठोकत पटवर्धनांच्या दिशेने पठानाचा वेडा तोडत पठानाना कापत पुढे निघाले पठानानी पटवर्धनांना घोड्यावरून खेचण्याच्या तयारीत असताना सिद्नाक महारानी पठाण सैनिकांना सपासप कापून काढून सेनापती भाऊसाहेब पटवर्धन यांना सही सलामत सुरक्षित ठिकाणी आणले आणि पुन्हा एकदा निजामाच्या सैन्यावर तुटून पडले निजामाच्या सैन्याला सळो की पळो करून सोडले. सिद्नाकाच्या जबरदस्त उठावामुळे चढाई मुळे नीजामांचा पराभव झाला. अशा पद्धतीने सेनापती पटवर्धनांना जीवदान दिले पेशव्यांची इज्जत वाचवली. खर्डाची लढाई जिंकली याच सर्व श्रेय सेनापती सिद्नाक महाराना जाते.

सवाई श्रीमंत दुसरे माधवराव पेशव्यांनी दरबार भरविला दरबारात सिद्नाक महाराना आपाल्या हातातील सोन्याचे कडे देऊन बहुमान करण्यात आला.

तसेच सेनापती भाऊसाहेब पटवर्धन यांनी कलंबी या ठिकाणी दरबार भरविला सिद्नाक महारांनी केलेले शौर्य कथन केले. सेनापती सिद्नाकाचा सन्मान केला.

श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांनी पुन्हा ब्रिटिशांच्या विरोधात लढाई करण्याचा ठराव आपल्या सर्व सरदार आणि मंत्रिमंडळ यांच्यासमोर ठेवला सेनापती बापू गोखले यांनी युद्धाचा प्रस्ताव सर्व सरदारां समोर ठेवला. महारांच्या सेनापती सिद्नाक महार दरबारात उभे राहिले सवाई माधवराव पेशवे यांना मुजरा करून अर्ज केले. श्रीमंत आम्ही आपल्या बाजूने सदैव लढत राहिलो आणि तुम्ही दिलेली प्रत्येक जबाबदारी आम्ही पार पाडली. पुढे देखील आम्ही आपल्या आज्ञेचे पालन करू परंतु एक विनंती अर्ज आहे आपण महार जातीच्या गळ्यातील मडके आणि पाठीमागची झाडू ही प्रथा बंद करावी ही विनंती अर्ज करत आहे. आपण आमच्या विनंतीला मान द्यावा. सवाई माधवराव पेशवे गरजले मनुस्मृतीच्या नियमाप्रमाणे आम्ही महार जातीच्या गळ्यामध्ये मडके आणि पाठीमागे झाडू बांधलेली आहे. तुम्हा महारांना सुईच्या टोकावर मावेल एवढी देखील सवळत मिळणार नाही. श्रीमंत सवाई माधवराव पेशव्यांनी भर दरबारामध्ये महार सेनापती यांचा अपमान केला. त्यांच्या स्वाभिमालाला ठेस पोचवली सिद्नाक महार दरबारातून तडक उठले आणि आपल्या महार सैनिकांना म्हणाले आता सहन होत नाही जिथे मान सन्मान नाही शौर्याची किंमत नाही महार सैनिकांनी लढाईत पेशव्यांकरिता रक्त सांडायचे परंतु त्या रक्ताची किंमत पेशव्यांना नाही. आता सहन होत नाही जोपर्यंत मी माझ्या महार जातीच्या गळ्यातील मडके आणि पाठीची झाडू काढून त्यांना त्यांचा स्वाभिमान परत मिळवून देणार नाही तोपर्यंत मी स्वस्त बसणार नाही पेशव्यांपेक्षा इंग्रज बरे आतापर्यंत आपण स्वकियांसाठी लढलो माझ्या शूर सैनिकानी मरण पत्करले युद्ध जिंकली परंतु पेशव्याने आम्हाला गुलामी दिली दारिद्र्य दिले आता लढाई स्वाभिमानाची अन्यायाविरुद्ध न्यायाची चला उठा माझ्या तलवारबाज शूर सैनिकांनो आणि आता पेशवाईला मातीत गाढायचे तरच महाराना स्वाभिमानाचे जगणे प्राप्त होईल. असे बोलून आपल्या सैन्यासह सिद्नाक महार कळंबीला निघून गेले. सिद्नाक महार संधीची वाट पाहू लागले.

सेनापती बापू गोखले यांच्या नेतृत्वात ५ नोव्हेंबर१८१७ रोजी खडकीची लढाई झाली. सिद्नाक महारानी लढाईत भाग घेतला नाही. परिणाम पेशव्यांचा पराभव झाला ब्रिटिशांनी लढाई जिंकली. सेनापती बापू गोखले यांच्या नेतृत्वात १७ नोव्हेंबर १८१७ रोजी येरवड्याची लढाई ब्रिटिश आणि पेशवे यांच्यात झाली. सेनापती बापू गोखले यांना पराभवाला सामोरे जावे लागले. या लढाईनंतर श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांना आपला जीव वाचवण्यासाठी आपल्या सैन्यासह पळून जावे लागले. यावरून महाराचे शौर्य आणि लढाऊपणा सिद्ध होतो जिकडे महार तिकडे विजय हे निश्र्चित होते.

सिद्नाकाच्या मनामध्ये पेशव्यांच्या अन्यायाच्या विरोधात सुडाची भावना जागृत झाली.महार सेनापती सिद्नाक लढाऊ सैनिकांबरोबर चावडीवर विचार करत असताना सिद्नाकाचा गुप्तहेर तेथे पोहोचला. मुजरा करून गुप्त बातमी सांगण्यास सुरुवात केली . कॅप्टन फ्रान्सिस स्टेटान आपल्या बॉम्बे नेटीव्ह इन्फंट्री सेकंद बटालियन रेजिमेंट (महार रेजिमेंट) बटालियन मध्ये बहुसंख्य महार होते. ही बातमी मिळताच आपल्या महार सैनिकांना सिद्नाक महार म्हणाले चला उठा माझ्या शूरवीर सैनिकांनो सर्व महार सैनिक एकवटले सिद्नाक महार आपल्या आवडत्या घोड्यावर बसून पुढे निघाले पाठून घोडदळ पायदल हर हर महादेव घोषणा देत निघाले ते थेट भीमा कोरेगावत पोहचले. सिद्नाक महार आले आहेत ही बातमी महार बटालियनमध्ये पसरली आणि नवचैतन्य महार सैनिकांमध्ये निर्माण झाले. रणझुंझार सेनापती सिद्नाक महाराच्या नावाने घोषणा महार रेजिमेंटचे सैनिक देत होते. सिद्नाक महार कॅप्टन स्टेटोन यांना भेटले. दोघांमध्ये सल्लामसलत झाली. महार सेनापती म्हणाले आम्ही पेशव्यांच्या विरोधात लढायला तयार आहोत पण आमच्या अटी आहेत. आता पर्यंत इमानाने पेशव्यांकरिता लढलो आमचे रक्त सांडवले परतू माझ्या महार जातीला जगण्याचे हक्क अधिकार नाहीत.आम्ही तुमच्या बाजूने लढण्याचा प्रस्ताव आपल्यासमोर मांडत आहोत परंतु तुम्ही महार जातीच्या गळ्यातील मडके आणि पाठी बाधलेली झाडू तुम्हाला कायमची दूर करावी लागेल. आमचे अधिकार आम्हाला मिळवून द्यावे लागतील. क्षणाचाही विलंब न करता कॅप्टन फ्रान्सिस स्टेटोन यांनी प्रताव मान्य करून सिद्नाक महाराजांचे स्वागत केले. कॅप्टन आणि सिद्नाक यांनी युद्धाची रणनीती ठरविण्यास सुरुवात केली. सेनापतीने कॅप्टनला सांगितले आपल्याला गनिमी काव्याने लढायचे आहे. माझे निवडक महार हुल देणारे घोडदळ सैनिक पेशव्यांच्या सैन्यावर चालून जाणार पेशव्यांचे सैन्य पाठलाग करत गावाची कुस ओलांडून आतमध्ये जवळ आले की ते पळून जाणार गावात घराच्या आडोशाला लपून असलेले माझे घोडदळ सैनिक त्यांच्यावरती हमला करणार अशा अनेक प्रकारच्या युद्धनीती ठरल्या सेनापतींनी आपल्या पाचशे शूर महार सैनिकांना तसेच महार रेजिमेंट मधील सैनिकांना उद्देशून म्हणाले भीमा कोरेगावची लढाई ही जगाच्या पाठीवर न भूतो आणि भविष्य अशी लढाई ठरणार आहे.आपल्याला लढाई जिंकायची आहे आणि आपण ही लढाई जिंकण्यासाठीच लढत आहोत. भीमा कोरेगावची लढाई ही महाराच्या मृदूमकीची सनद ठरणार आहे अन्याय विरुद्ध न्यायाची मोहर ठेवणारी ही लढाई आहे मनुस्मृतीच्या कायद्याच्या विरोधातील सशस्त्र उठाव आहे. पेशव्यांच्या अन्यायाच्या विरुद्ध महारांचा हा वेदनांचा उद्रेक आहे. पेशवे आणि ब्रिटिशांसाठी ही जरी हार आणि जीत यांची लढाई असली तरी तुमच्या जीवन मरणाचा प्रश्र्न आहे. आपण जर युद्धात जिंकलो तर भविष्यात महार जात आपल्याला कदापि विसरणार नाही. अत्याचारी दूराचारी पेशव्यांचा बिमोड करण्याचा हा आजचा दिवस आहे. महारांचा पिशव्यांनी केलेल्या आपमानाचा बदला घेण्याची वेळ आहे. माझ्या महार सैनिकांनो आज आपली तहान आणि भूक आजच्या युद्धामध्ये विजयश्री खेचून आणून भागवायचीआहे. मनुस्मृतींच्या पुजाऱ्यांचा देव्हारा उद्धस्त करायचा आहे. आपल्याला लढायचं आहे आपले अधिकार प्राप्त करून घेण्याकरिता, पेशव्यांचे सैन्य आपल्यापेक्षा ४० पटीने जास्त असले तरी आपली लढाई ही स्वाभिमानाची आहे अधिकाराची आहे. मान सन्मानाची आहे. आज जर आपण युद्धभूमीवर हरलो तरी पेशवे आपल्याला जिवंत सोडणार नाही. आपल्याला हे युद्ध जिंकायचे आहे. आपल्यासमोर दोनच पर्याय आहेत मारणे किंवा मरणे आपल्याला जिंकायचे आहे. हे महार सैनिकांनी ऐकले महार सैनिकांच्या अंगामध्ये नवचैतन्य निर्माण झाले. ५०० महार सैनिक पेशवांच्या २८००० सैन्यासमोर उभे ठाकले. ५०० पायदळ २५० घोडेस्वार जवान, दोन तोफा २४ युरोपियन गनर्स आणि मदतीला रणझुंजार महार सेनापती सिद्नाक महार आणि त्यांचे ५०० लढाऊ महार सैनिक होते.आजचे युद्ध पेशव्यांचे सेनापती गोखले विरुद्ध रणझुंजार सेनापती सिद्नाक असे होते. दिवस होतो १ जानेवारी १८१८ सकाळचे ९.०० वाजले होते.कॅप्टन स्टेटोन आपल्या सैन्याला युद्धाची सूचना केली. भीमा कोरेगावच्या गावात युद्धाची धुमचक्री चालू झाली. हर हर महादेव घोषणा देत महार सैनिक पेशव्यांच्या सैन्यावर तुटून पडले. युद्ध जुंपले तलवारीला तलवारी भिडल्या रणवाद्य वाजू लागली.महार सैनिक बेभान होऊन लढत होते. महार सैनिकाच्या मनातील राग त्यांच्या संतप्त भावना ते तलवारीतून व्यक्त होत होत्या. महार सैनिक आपल्या बंदुकीतून गोळ्यांच्या फेऱ्या झाडत होत्या. लेफ्टनंट चीस्लोमा तोफा डागत होता. पेशव्यांचे सैन्य भाजून निघत होते देहाच्या चिंधड्या होत होत्या. महार सेनापती त्यांचे सैन्य पेशव्यांच्या सैन्याला कापत कापत पुढे जात होते. बाजूलाच असलेली भीमा नदीचे पाणी रक्ताने लाल झाले होते. घनघोर युद्ध चालू होते. एक महार योद्धा पेशव्यांच्या ५६ सैन्यांला भारी पडत होते. तोफेच्या माऱ्यानी सैन्यांमध्ये भगदड माजली होती. दहशतीचे आणि भीतीचे वातावरण पेशव्यांच्या सैन्यामध्ये होते. सेनापती सिद्नाक आपल्या अठरा किलो वजनाच्या तलवारीने पेशव्यांच्या सैन्यांवर प्रहार करीत होते सिद्नाक महाराचे अक्राळ विक्राळ रूप पाहून पेशव्यांचे सैन्य सैरा वैरा पळत सुटत होते एवढी मोठी दहशत सिद्नाक महाराची पेशव्यांच्या सैन्यांत होती. तलवारीच्या आघाताने मुंडकी छाटली जात होती शरीर कापली जात होती. काही सैनिक जबर जखमी झाले पेशव्यांचे घोडे घाबरून स्वरांना खाली पाडून सैरा वैरा धावत होते खाली पडलेल्या सैनिकांना घोडे आपल्या टाचाखाली तुडवत सुटले. रणवाद्य जोराने वाजू लागली. सिद्नाकाचे महार सैनिक आवेषाने पेशव्यांच्या सैन्यावर चढाई करत होते. पेशव्यांचे सैनिक भीमा नदी उतरून पळत सुटले महार सैनिकानी चारही बाजूंनी पेशव्यांच्या सैन्याला गराडा घातला महाराच्या तलवारीतून पेशव्यांचे सैन्य सुटत नव्हते सेनापती सिद्नाक आपल्या सैनिकांना बरोबर घेऊन पेशव्यांच्या सैनिकावर तुटून पडले समोरील सैन्याला तलवारीच्या एका फटक्याने गाराद करीत होते. तेवढ्यात महार सैनिकाने बातमी आणली ३००० अरब सैन्याची तुकडी ब्रिटिश फोजावर हल्ला चढविला दोन्ही सैन्यात घमासान युद्ध सुरू झाले सिद्नाकानी आपला घोडा अरब सैन्याच्या दिशेने वळविला हर हर महादेवचा जयघोष करीत आपल्या सैन्याला म्हणाले मारा कापा कापून काढा गाव कब्जा करणाऱ्या तुकडीवर हल्ला चढविला तलवारीवर तलवारी आढळत होत्या.बंदुकीतील गोळ्यांची फेरीवर फेरी झडत होत्या तोफा आग ओकत होत्या. लेफ्टनंट चेस्लोमा यांना पेशव्यांच्या सैनिकांनी घेरून तोफ निकामी केली लेफ्टनंटचे मुंडके छाटले तलवारीच्या टोकावर मुंडके घेऊन नाचत होते.त्यांच्या शरिराचे हजारो तुकडे केले इंग्रजांच्या सैन्य बिथरले गोंधळ निर्माण झाला सिद्नाकांनी आपला घोडा तोफेच्या दिशेने शिफाशतीने वळवीला आणि पेशव्याच्या सैनिकावर तुटून पडले पेशव्यांच्या सैनिकांना माघार घ्यावी लागली. आपला मोर्चा सेनापती बापू गोखळे याचा मुलगाकडे वळविला महार सैनिकाने गोविंदबाबाला घेरले घनघोर लढाई झाली गोविंदबाबा जखमी होऊन खाली पडणार इतक्यात एक गोळी गोविंदबाबाला लागली आणि तो खाली पडला पेशव्यांच्या सैन्यात गोंधळ माजला पळापळ सुरू झाली. पेशव्यांच्या शववाहक पथकाने गोविंदबाबाचा देह उचलून पळविला ही वार्ता सेनापती बापू गोखले यांना समजली सेनापती खचला इतक्याच शेव वाहकाने देह आणला गोविंदबाबाचा रक्तबंबाल शरीर पाहताच सेनापती बापू गोखले रडू लागला मोठ्याने आक्रोश करू लागला सैन्याचे मनोबल खचले इतक्यात गुप्तहेराने बातमी सेनापती बापू गोखले यांना दिली की महाराचा सेनापती सिद्नाक महार चालून येत आहे ही बातमी ऐकून बापू गोखले आपल्या सैनिकासह पळून गेले.अगोदर श्रीमंत सवाई श्रीमंत माधवराव पेशवे युद्ध भूमीतून आपला जीव वाचविण्याकरिता पळून गेले. रणझुंजार महापराक्रमी महार सेनापती दुसरे सिद्नाक महाराने यांनी आपल्या ५०० शूरवीर सैनिकांनी आपल्या पराक्रमाने भिमाकोरेगाव युद्ध जिंकले आणि महार जातीच्या गळ्यातील मडके आणि पाठची झाडू दूर केली. महाराचे सेनापती सिद्नाक महार त्यांचे शूर सैनिकांनी खऱ्या अर्थाने पेशव्यांचा पराभव करून आपल्या महार जातीला न्याय मिळवून दिला. पेशव्यांच्या जुलमी राजवटीला आणि अहंकाराला मातीत गाडले.कॅप्टन स्टेटोन यांनी सिद्नाक महार आणि त्यांच्या सैन्यांचा बहुमान केला. ब्रिटिश सरकारने महार सैन्य मृत्यूमुखी पडले त्यांच्या आठवणीत भीमा कोरेगावचा विजयस्तंभ बांधला आणि आज देखील भीमा कोरेगावचा विजयस्तंभ महाराच्या शौर्याची गाथा सांगत उंच उभा आहे . लष्कराच्या इतिहासात भिमा कोरेगावच्या विजय म्हणजे शौर्य आणि पराक्रमाची गाथा आहे. हा विजय म्हणजे अन्यायाच्या विरोधात मिळवलेला विजय आहे. भीमा कोरेगाव लढाईची विजयी साक्ष देणारा विजयस्तंभ महारांच्या पराक्रमाची कीर्ती अजरामर राहावी म्हणून भीमा कोरेगाव येथे भिमा नदीच्या काठी प्रशस्त मैदानावर युद्धाची पहिली ठिणगी पडली त्या ठिकाणी इंग्रजांनी भव्य असा स्तंभ उभारला आहे २६ मार्च १८२१ रोजी या भव्य विजय स्तंभाची पायभरणी कार्यक्रम अत्यंत शानदार अशा सोहळ्याने बंदुकीच्या फेरी आणि तोफांच्या सलामीने करण्यात आला.१८२२ विजय स्तंभाचे काम पूर्ण झाले पूर्वी या विजय स्तंभाला 'महार स्तंभ' असे होते हा विजय स्तंभ ६५ फूट उंच आहे. विजयस्तंभ म्हणजे महार योद्धांच्या शौर्याचे प्रतीक आहे.

भीमा कोरेगावच्या विजय स्तंभाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १ जानेवारी १९२७ रोजी पुणे येथील शिरूर जवळ भिमा कोरेगाव येथील शौर्य पराक्रमाची गाथा असलेल्या विजय स्तंभाला भेट देऊन आपल्या सहकाऱ्यांसोबत मानवंदना दिली व स्मृतिदिन साजरा केला.

कोल्हापूर माणगाव या ठिकाणी महार परिषद २० मार्च १९२० साली आरक्षणाचे जनक राजश्री शाहू महाराज यानी परिषदेचे अध्यक्ष होते. तसेच रणझुंजार सेनापती सिद्नाक महार यांचे नातू दादासाहेब इनामदार (राजे साहेब) हे स्वागत अध्यक्ष होते. अस्पृश्यांचे नेते डॉ.बाबासाहेब आंबेडकर परिषदेत उपस्थित होते. (बाबासाहेबांचे वय फक्त २९ वर्षाचे होते.) छत्रपती शाहू महाराज म्हणतात. अस्पृश्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने नेते मिळाले आहेत ते नक्कीच अस्पृश्याचा उद्धार करतील यात शंका नाही. खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच अस्पृश्यांचे नेते आहेत असे राजश्री शाहू महाराज यांनी जाहीर केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज राजश्री शाहू महाराज, सिद्नाक महाराचे वंशज दादासाहेब इनामदार सुभेदार रामजीबाबा सूपुत्र अस्पृश्य बहुजनांचा कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही युगप्रवर्तक मंडळी एकाच विचार मंचावर एकच विचार धारेवर मार्ग क्रमन करून समाज उद्धारक काम करीत होती. तथागत गौतम बुद्ध,रूढी परंपरा विरोधात उभे राहणारे संत, स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, काला पुढे चालणारे महानायक सत्यशोधक महात्मा ज्योतिबा फुले यांची विचारधारा पुढे घेऊन जाणारे तिला मूर्त स्वरूप देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान देऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता, आणि न्याय सविधानामध्ये अंतर्भूत करून आमचे हक्क आणि अधिकार प्राप्त करून दिले. परंतु याची खरी सुरुवात रणझुंजार महार सेनापती सिद्नाक महार यांनी १ जानेवारी १८१८ केली याची आपल्याला प्रकर्षाने आठवण होते. महापराक्रमी महार सेनापती सिद्नाक महाराना आणि त्यांच्या महार योद्धा सैनिकांना विनम्र अभिवादन.


**महेंद्र शांताराम चापे (मुंबई)**
**(व्याख्याते विचारवंत अभ्यासक)**
**फोन:९०२९२७५२५४**

# भीमा कोरेगाव ! सलाम शूर सैनिकांना !!

भिमा कोरेगाव ! शूर, स्वाभिमानी, प्रामाणिक आणि माय भूमीशी इमान राखणा-या महार सैनिकांच्या दैदिप्यमान शौर्यगाथाची साक्ष देत सतत स्मरण करून देणारे ऐतिहासिक स्थान म्हणजे 'भीमा कोरेगाव'. परंतु बहुजन आणि त्यातही पूर्वाश्रमीच्या 'महार' जात समुहा शिवाय इतरांना हे स्थान आणि त्याचा इतिहास माहीत नाही.आणि त्याला कारण सत्य इतिहास लपवणे आणि लपवता येत नसेल तर इतिहासाचे विकृतीकरण करण्याची आणि ती जनतेच्या माथी मारायची इथली विकृत परंपरा.

भीमा कोरेगावच्या या युद्धात इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीने महार रेजिमेंटच्या मदतीने पेशव्यांच्या सैन्याला अक्षरशः सळो की पळो करून त्यांचा पराभव केला.महारांच्या या विजयाच्या स्मरणार्थ येथे 'विजय स्तंभ' स्थापन करण्यात आला आहे, जेथे खरं तर दरवर्षी एक जानेवारी रोजी स्वतंत्र जातीच्या पलीकडे जाऊन तमाम बहुजनांनी एकत्र येऊन त्या विजय स्तंभांचा मानवंदना देणे अपेक्षित आहे.परंतु जिथे बहुजनांचा खरा इतिहास दडवण्याची प्रथा आहे तिथे शूर लढवय्ये महारांचा पराक्रम,त्यांची शौर्यगाथा कशी गायली जाईल ? जसे अफजलखानचा कोथळा आणि शाहीस्ते खानच्या बोटांची कथा विकृत वृत्तीने रंगवून बालपणापासूनच मुस्लिम द्वेषाची बीजे पेरण्याच्या उद्देशाने सांगितले जातात मात्र, त्याच कालावधीतील कृष्णा भास्कर कुलकर्णीने गद्दारी केल्यामुळे छत्रपती शिवरायांनी त्याचा शिरच्छेद केलेला प्रसंग सत्य मांडणा-या इतिहास संशोधक आणि अभ्यासक वगळता कुणाकडुनही कधीच सांगितला जात नाही.सांगितला गेला तरी कृष्णा भास्कर एवढेच सांगितले जाते कुलकर्णी हे त्यांचे आडनाव लपविले जाते.असो ! इतिहासात अशा अनेक गोष्टी आहेत. क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुलेंनी शोधून काढल्यावर शिवरायांची रायगडावरील समाधीची लोकांना माहिती झाली. तोच प्रकार भीमा कोरेगावच्या ऐतिहासिक प्रसंगा बाबतही करण्याचा सुरुवातीला प्रयत्न झाला.मात्र 'जे लोक आपला इतिहास विसरतात,ते कधीही इतिहास निर्माण करणार नाहीत' या बाबासाहेबांच्या विचारसरणी नुसार त्या ठिकाणी आपले अस्तित्व आणि स्वाभिमानाची लढाई लढताना त्या लढाईत प्राण गमावलेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ आणि गौरवार्थ त्यांची नावे त्यावर कोरून जो स्तंभ ब्रिटिशांनी उभारला आहे,त्या विजय स्तंभ स्मारकाला एकोणीसशे सत्तावीस मध्ये बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकरांनी पहिल्यांदा भेट दिल्यामुळे समाज अधिक जागृत झाला. त्यानंतर दलित बांधव या युद्धात शहीद झालेल्या शूर वीरांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आणि आपल्या पूर्वजांच्या शौर्याचे स्मरण करण्यासाठी एकत्र येण्याची प्रथा सुरू झाली. त्यामुळे त्या स्थळाविषयी काही करण्याचे अथवा लपविण्याचे धाडस इथल्या कुणालाच करता आले नाही.त्यानंतर प्रत्येक वर्षी एक जानेवारीला नियमितपणे त्या विजय स्तंभाला मानवंदना देण्याची जाहीर प्रथाच पडली. मात्र इथला खरा इतिहास माहीत होऊन याचे महत्व वाढू नये म्हणून मानवंदना देण्याची प्रथा बंद करून इथले महत्त्व कसे घालवता येईल याची घालमेल, मनातली विकृतीची आग काही जणांच्या मनात वर्षोनुवर्षे सतत धुमसत होती. त्यासाठी योग्य संधीच्या शोधात असलेल्यांना अखेर संधी लाभली. एक जानेवारी दोन हजार अठरा या दिवशी भीमा कोरेगावच्या ऐतिहासिक विजयी लढ्याला दोनशे वर्षे पूर्ण झाल्या प्रित्यर्थ आयोजित केलेल्या भव्य शानदार कार्यक्रमाच्या प्रसंगी त्या लोकांनी ही संधी साधली.

वर्षानुवर्षे कोरेगावच्या त्या विजयी स्तंभांला शांततापूर्ण वातावरणात मानवंदना देण्याची शिस्तबद्ध परंपरा असताना आणि ती त्याच पद्धतीने पाळण्यासाठी समाज मोठ्या संख्येने एकत्र जमलेला असताना एक जानेवारी दोन हजार अठरा रोजी भारतीय जनता पक्षाचे सरकार असताना देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते.विशेष म्हणजे गृहमंत्री पदही त्यांच्याकडे असूनही या कार्यक्रमाला इतिहासात पहिल्यांदाच गालबोट लावण्याच्या उद्देशाने विजय स्तंभ दर्शनार्थींमध्ये भीती निर्माण करण्यासाठी हल्ले केले गेले.काही हिंसक घटना घडवून आणल्या गेल्या. जवळपास सात ते आठ किलोमीटर पर्यंत बहुजनांच्या रांगा लागल्या असल्यामुळे.विजय स्तंभापासून लांब असणा-यांना आणि बाहेरच्या लोकांना तिथे चालवलेल्या दंगलीची खबर लागु नये म्हणून मोबाईल सेवा खंडित करण्यात आली., आलेल्या लोकांची खाण्यापिण्याची गैरसोय व्हावी म्हणून उघडी असलेली दुकाने आणि उपहारगृहे बंद करायला लावली गेली संध्याकाळ होताच संपूर्ण. परिसरातील वीजपुरवठा बंद करण्यात आला. बाबासाहेबांच्या पुण्याईने चार चाकी वाहने घेऊन आलेल्या अनुयायांनी आपापल्या गाड्यांचे दिवे एकाचवेळी लावल्याने संपूर्ण परिसर प्रकाशमय झाल्याने काही प्रमाणात का होईना लोकांची सोय झाली.हे सगळं अतिशय नियोजनबद्ध रितीने करण्यात आले होते.मात्र या उपद्रवी कारवायांचा परिणाम ते करणा-यांना चपराक बसून उलट भीमा कोरेगाव हे नाव मिटण्याऐवजी केवळ भारतीयच नव्हे, तर आंतर्राष्ट्रीय स्तरावर ही शौर्यगाथा जावून पोहोचली.या घटनेला आज पाच वर्षं पूर्ण होत आहेत.असो !



कोरेगाव येथे दोन शे पाच वर्षांपूर्वी म्हणजे अठराशे अठरा च्या या युद्धात असं काय घडलं होतं की, भविष्यात येणाऱ्या बहुजन पिढीने त्या ठिकाणच्या शौर्याच्या स्मृती सतत जागवत ठेवून स्वाभिमान जपत स्फुर्ती घ्यावी म्हणून मोठ्या गौरवाने इंग्रजांनी तिथे कायम स्वरुपी विजय स्तंभ उभारलेला आहे इतकेच नव्हे तर या युद्धात शहीद झालेल्या महार योद्ध्यांची नावेही या स्तंभावर कोरलेली आहेत. इतिहासाचा महत्त्वपूर्ण टप्पा असलेल्या भीमा कोरेगावच्या लढाईचं सत्य सर्व भारतीयांनी जाणून घेणे गरजेचे आहे. ही घटना इ.स.अठराशे सतरा मधील वर्षाच्या अखेरच्या दिवशीची आहे. तेव्हा दुसरा पेशवा बाजीराव यांच्या नेतृत्वाखाली अठ्ठावीस हजार सैनिक इंग्रजांवर हल्ला करण्यासाठी पुण्याकडे निघाले होते. वाटेत त्यांना आठशे सैनिकांची एक तुकडी भेटली, जी पुण्यात ब्रिटीश सैनिकांना साथ देण्यासाठी जात होती.पेशव्यांनी आपल्या सैनिकांकडून त्यांच्यावरही अयशस्वी हल्ला केला.

या लढाईचा उल्लेख जेम्स ग्रँट डफ यांच्या 'अ हिस्ट्री ऑफ द मराठाज' या पुस्तकात आहे. त्यानुसार पाचशेहून अधिक संख्येने सहभागी असलेल्या महार समाजाच्या सैनिकांनी या युद्धात पेशव्यांच्या अठ्ठावीस हजार सैनिकांना भीमा नदीच्या काठावर रोखले. इतिहासात नोंद असलेल्या या लढाईतील कॅप्टन फ्रान्सिस स्टॉन्टन यांच्या नेतृत्वाखाली ईस्ट इंडिया कंपनीच्या या तुकडीने रात्रभर बारा तास लढा दिला.आठशे सैनिकांच्या तुकडीत पाचशे हुन अधिक संख्या असलेल्या महारांनी अठ्ठावीस हजार

पेशव्मांचा ख-या आर्थाने पराभवच केला असे म्हणावे लागेल..त्यांना सपशेल माघार घ्यायला लावले होते.

पेशव्यांकडून मराठा सैनिकांना ज्यांच्याशी लढावे लागले, त्यातील बहुतांश सैनिक हे दुर्दैवाने महार/ दलित समाजाचे होते. ते बॉम्बे नेटिव्ह इन्फंट्रीचे होते.दुर्दैवाने यासाठी म्हणायचे की, इतिहासाचे सखोल संशोधन आणि अभ्यास करणा-यांच्या मते महार आणि मराठ्यांमध्ये यापूर्वी कधीही मतभेद झालेले नव्हते/ नाहीत ..त्यामुळे त्यांच्यात वैर असण्याचा आणि ते एकमेकांशी भिडण्याचा प्रश्नच नव्हता. इंग्रजांच्या नावावर ज्या अनेक गोष्टी खपविल्या जातात.त्यापैकी मराठ्यांच्या साम्राज्याची ही अशीच गोष्ट आहे.ते चालविण्यात जर इंग्रजांचा त्यात हात असता तर इंग्रजांच्या हाती सत्ता जायला हवी होती.परंतु तसे झाले नाही.सत्ता पेशव्यांच्या हातात आली.याचाच अर्थ तत्कालीन ब्राह्मणांनी मराठ्यांकडून पेशवाई हिसकावून घेतली आणि त्यांच्या लढवय्ये पणाचा आपल्यासाठी उपयोग करून घेण्याची धूर्त खेळी केली.जिथे यश मिळायचे तिथे 'पेशव्वांचा विजयी पताका असा जल्लोष आणि अपयश आले की,मराठ्यांचा पाडाव असा शब्दछल करून गैरसमज पसरविला जायचा.अगदी तस्साच प्रयोग कोरेगावच्या बाबतीत करण्यात आला.कोरेगावच्या अपयशात जाणीवपूर्वक मराठ्यांचे नाव ठळकपणे आणले गेले. त्यामुळे मराठे संतप्त होणे स्वाभाविक आहे.

ब्रिटिशांनी या युद्धात विजय मिळवला होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या या तुकडीत भारतीय वंशाचे काही सैनिक होते. त्यात महार समाजाची संख्या अधिक होती.ते सगळेजण बॉम्बे नेटिव्ह इन्फॅन्ट्री विभागाशी संलग्न होते. याला कारण त्यावेळी माणसा माणसात भेद मानणारी विषमतेवर आधारित असलेली जाती व्यवस्थाच होती.

या लढ्याबाबत काही तज्ज्ञांचे असे मत आहे की महार हे इंग्रजांच्या वतीने लढले असले तरी ते इंग्रजांसाठी नव्हे, तर त्यांच्या स्वतःच्या अस्तित्व आणि अस्मितेसाठी लढले होते. कारण पेशवे राज्यकर्ते महारांना 'अस्पृश्य' मानत असत. काही इतिहासकार सांगतात की त्यांची अवस्था इतकी वाईट होती की शहरात प्रवेश करताना महारांना कंबरेला झाडू बांधून चालावे लागत असे. जेणेकरून पायी चालताना उमटलेले त्यांच्या पावलांचे ठसे झाडूने पुसले जावेत. शक्यतो त्यांनी सूर्योदय आणि सूर्यास्त दरम्यान बाहेर पडू नये. जेणेकरून त्यांची सावली इतरांवर पडू नये. इतकेच नाही तर त्यांनी रस्त्यावर इतरत्र थुंकू नये म्हणून त्यांना गळ्यात एक मडके अडकवून फिरावे लागत होते जेणेकरून ते त्यातच थुंकावेत , त्यांना नवे अथवा चांगले कपडे परिधान करायला बंदी होती.विहिरी आणि डबक्यांतून निसर्गदत्त पाणी काढण्यासाठी ही त्यांच्याशी भेदभाव केला जात होता.जरी त्याकाळी महार समाजातील लोकांना अस्पृश्य मानण्यात येत असले तरी इंग्रजांचा मात्र मानवता आणि समानतेवर विश्र्वास होता. या सर्व कारणामुळेच महार समाजानं ईस्ट इंडिया कंपनीच्या तुकडीत सामील होण्याचा निर्णय घेतला, ब्रिटिश सैन्यानं महार समाजातील व्यक्तींना लष्करी प्रशिक्षण दिलं आणि पेशव्यांविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. म्हणूनच भीमा कोरेगावचा हा प्रसंग दलित चळवळीच्या इतिहासातला महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचं दलित कार्यकर्ते मानतात आणि ब्रिटिशांच्या त्या विजयाचा जल्लोष दलित समाज साजरा करतो.

काही इतिहासकारांचे या लढ्याबाबत असे मत आहे.त्यांचा असा विश्र्वास आहे की महारांनी मराठ्यांचा नाही तर ब्राह्मणांचा पराभव केला होता.

कोरेगावची लढाई या नावानं प्रसिद्ध असलेल्या या युद्धात वर उल्लेख केल्याप्रमाणे दुसरे बाजीराव पेशवे यांच्या नेतृत्वाखाली पेशव्यांनी कोरेगाव स्थित ईस्ट इंडिया कंपनीवर आक्रमणासाठी पाठवलेल्या तुकडीत मराठ्यांचे/पेशव्यांचे एक दोन नव्हे,तर तब्बल अठ्ठावीस हजार सैनिकांचा समावेश होता. २८००० सैनिकांचा समावेश असलेल्या फौजेच्या मानाने आक्रमणाचा मुकाबला करण्यासाठी त्यांच्यासमोर ब्रिटिश सैन्याची कुमक अगदीच तोकडी म्हणजे केवळ आठशे सैनिकांचा समावेश असलेली तुकडी उभी ठाकली. तरि देखील फ्रान्सिस स्टॉन्टन यांच्या नेतृत्वाखाली ईस्ट इंडिया कंपनीच्या या तुकडीने सतत बारा तास भिडत खिंड लढवली. त्यात पेशव्याचे आतोनात सैन्य कामी आले.रात्रभर चाललेल्या लढाईनंतर नव्या वर्षाच्या सुरुवातीला सकाळी दहा वाजता ईस्ट इंडिया कंपनीचं सैन्य भीमेच्या किनाऱ्यावर पोहोचलं. जेव्हां ते नदीच्या दिशेने मार्गक्रमण करत राहिले. तेव्हां ते नदी पार करतील असं पेशव्यांच्या सैन्याला वाटत होतं.परंतु त्यांनी नजीकच्या गावावर कब्जा केला आणि त्याचं रुपांतर गढीत केलं. अशा वेळी जर जनरल जोसेफ स्मिथ यांच्या नेतृत्वाखालील मोठं सैन्य दाखल झालं, तर त्यांचा सामना करणं अवघड ठरेल याची जाणीव झाल्याने भीतीने पेशव्यांना माघार घ्यायचा निर्णय घ्यावा लागला आधीच मोठ्या प्रमाणात सैन्य कामी आलेलं होतं हा सर्व विचार करून ते मागे परतले असे म्हणण्यापेक्षा अक्षरशः जिवांच्या आकांताने त्यांनी पळ काढला. कारण जनरल जोसेफ स्मिथ यांच्या नेतृत्वाखालील मोठं सैन्य दाखल झाले असते, तर त्याच ठिकाणी पेशव्यांचा पार खात्मा झाला असता. हेन्री टी प्रिंसेप यांनी 'हिस्टरी ऑफ द पॉलटिकल अँड मिलिट्री ट्रान्जॅक्शन्स इन इंडिया' या पुस्तकात या लढाईचा संदर्भ आहे. महार समाजातल्या माणसांचा समावेश असलेल्या ईस्ट इंडिया तुकडीच्या धाडसाचं वर्णन या पुस्तकात अधिक सविस्तरपणे केलेले आहे.ब्राह्मणांनी जबरदस्तीने अस्पृश्यता लावल्याने महार समाज नाराज होता. ही अनिष्ट पद्धत बंद करण्याबाबत बहुजन संत आणि समाजसुधारकांनी वेळोवेळी वेगवेगळ्या माध्यमातून ब्राह्मणांना सांगून पाहिले. मात्र त्यांनी ऐकलं नाही.याच कारणामुळेच महार समाजानं ईस्ट इंडिया कंपनीच्या तुकडीत सामील होण्याचा निर्णय घेतला. तत्कालीन ब्राह्मणांनी अस्पृश्यतेची अमानवीय प्रथा बंद केली असती तर या लढाईचे चित्र कदाचित वेगळेच दिसते.

वास्तवात मराठ्यांच्या शक्तीच्या जोरावर पेशवाई टिकून होती,म्हणून जेम्स ग्रांट डफ यांनी आपल्या पुस्तकात या लढाईचा उल्लेख 'ए हिस्टरी ऑफ द मराठाज' असा केला असावा.ही लढाई मराठ्यांविरुद्धची नव्हे तर पेशवाई विरुद्धची लढाई होती. त्यामुळे महारांनी या लढाईत पेशव्यांचा निःपात केला मराठ्यांचा नाही हे सदैव लक्षात ठेवले पाहिजे कारण, अभ्यासकांच्या मते महार आणि मराठा यांच्यादरम्यान कधीच मतभेद किंवा संघर्ष नव्हता. इतिहासात अशा वादावादाची कुठलीही उदाहरणें आढळत नाहीत. मराठ्यांचं राज्य पेशवाईत तत्कालीन ब्राह्मणांच्या हाती होतं. केवळ महार आणि मराठा या दोन्ही लढवय्ये जातीय तेढ निर्माण व्हावी म्हणून भीमा कोरेगावच्या संदर्भात सतत जाणीवपूर्वक मराठ्यांच्या सैनिकांचा उल्लेख केला जातो. ही लढाई खरं तर पेशव्यांची शेवटची मोठी लढाई म्हणावी लागेल. ब्रिटिशांना त्यांना नमवायच होतं. म्हणूनच ब्रिटिशांनी महार समाजातील शूर वीरांना हाताशी धरले आणि पेशवाई संपुष्टात आणली. अशी आहे भीमा कोरेगावची खरी शौर्य गाथा ! मानवांचे अस्तित्व आणि स्वाभीमान जपणा-या शूर महार सैनिकांना मनापासून सलाम ! **-विठ्ठलराव वठारे अध्यक्ष,जन लेखक संघ. महाराष्ट्र**

# कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभाला सर्वांनी अभिवादन का करावे?

छत्रपती शिवाजी राजांनी सुरू केलेला शिवशक पेशव्यांनी बंद पाडला आणि मुघलांचा फसली शक सुरु केला. पेशव्यांनी छत्रपती संभाजीराजांना तीन वेळा मारण्याचा कट केला आणि शेवटी संस्कृतवरती प्रभुत्व मिळविल्यामुळे औरंगजेबाच्या ताब्यात देऊन ब्राह्मणीधर्मानुसार त्यांना हाल हाल करून ठार मारले ! पहिल्या बाजीराव पेशवेव्याने गुजरात जिंकणाऱ्या मराठा सरसेनापती उमाबाई दाभाडे यांना तह करण्यासाठी आळंदीजवळ बोलावून कैदेत टाकले आणि त्यांना कैदेत मारले. त्यांच्या मुलाला द्वेषापोटी दगाबाजीने मारले !

तिसऱ्या पानिपताच्या वेळेस अब्दाली युद्धाचे नियोजन करत होता, तर पेशवे यज्ञ, याग, होम हवन, भेदाभेद, व्रतवैकल्ये करण्यात दंग होते. भोजनाचे वेळी पेशवे हे जाधवराव, निंबाळकर, घोरपडे, शिंदे, होळकर, भोसले, पवार, जगदाळे इत्यादी मराठा सरदारांनादेखील पंक्तीला घेत नसत, शिवाजीराजानी कधीही भेदभाव केला नाही. पेशव्यानी अनैतिकतेचा कळस गाठला होता. अब्दाली युद्धाचे नियोजन करत होता, तेंव्हा पेशवे जप तप आणि भोजनाचे नियोजन करत होते. म्हणजे सदाशिव पेशव्याने एक लाख मराठयांना अब्दालीच्या समोर नेवून बळी दिले, तेंव्हा महाराणी ताराराणी म्हणाल्या बरं झालं पेशवाई बुडाली. पानिपतात पेशव्यांच्या पराभवाचा महाराणी ताराराणीला आनंद झाला, इतका पेशव्याबद्धल महाराष्ट्रात रोष निर्माण झाला होता !

छत्रपती शिवाजी महाराजांचे सातारा गादीचे वंशज पहिले छत्रपती प्रतापसिंह महाराज हे लहान वयात गादीवरती आले, तेव्हा दुसऱ्या बाजीराव पेशव्याने त्यांच्या शिक्षणावर बंदी घातली, कारण हा बाल छत्रपती शिकला तर शहाणा होईल आणि शहाणा झाला तर तो आपल्या अंकित राहणार नाही, म्हणून त्यांच्या शिक्षणावर बंदी घातली !

छत्रपती घराणे त्यांना चोरून शिकवेल म्हणून पेशव्यांनी सातारच्या राजवाड्या भोवती गुप्तहेर नेमले, तेव्हा छत्रपती प्रतापसिंह महाराजांची आई रात्री अडीच वाजता चोरून शिकवायची. छत्रपतींची ही अवस्था तर सामान्य रयतेचे पेशव्यांनी काय हाल केले असतील...?

**याची कल्पना करा !**

पेशव्यांना धडा शिकवण्यासाठी सातारा येथून पुण्याकडे सैन्य घेऊन निघालेल्या छत्रपती चतुरसिंग भोसले यांना दगाबाजीने पकडून दुसऱ्या बाजीरावाने कोकणातील कांगोरी किल्ल्यात डांबून छत्रपती चतुरसिंगांना हाल-हाल करून ठार मारले !

अमृतराव पेशवेव्याने खंडणी न देणाऱ्या शेतकऱ्यांना तापलेल्या तव्यावर उभे करून छळले, तर शेतकऱ्यांच्या लहान मुलांच्या बेंबीत आणि कानात तोफेची दारू भरून त्याला अग्नी द्यायचा, त्यामुळे मुलांचे डोके आणि पोट फुटायचे, इसिस, तालिबानी, नक्षली, सनातनी जसे निरपराध लोकांना निर्दयपाने मारतात, तसेच पेशवेदेखील निरपराध प्रजेला निर्दयपणे मारत असत !

इंदूरच्या विठोजी होळकर यांना पुण्यात हत्तीच्या पायाला बांधून पेशव्यांनी हालहाल करून ठार मारले. पेशवेकाळात अस्पृश्यांना तर माणूस म्हणून जगायचा अधिकार नव्हता. त्यांचा प्रचंड छळ झाला. कंबरेला केरसुणी आणि गळ्यात मडके अशी अस्पृश्याची अवस्था होती !

**युद्ध-वास्तव**

पेशव्यांनी सर्वाधिक छळ ब्राह्मण महिलांचा केला, महिलांचा जन्म जणू कांही उपभोग घेण्यासाठीच आहे, अशी महिलांची स्थिती पेशवाईत होती. त्या छळाचे या ठिकाणी वर्णन करणे देखील उचित ठरणार नाही ! छत्रपती शिवाजीराजे, छत्रपती संभाजीराजे यांच्या समतावादी, बुद्धीप्रामाण्यवादी, लोककल्याणकारी, महिलांचा सन्मान करणाऱ्या शासन व्यवस्थेला मूठमाती देण्याचे काम पेशव्यांनी केले, त्यामुळेच ५०० शूरवीर मावळ्यांनी ३०० ब्रिटिशांच्या मदतीने २८ हजार पेशव्यांचा पराभव केला. त्या ५०० शूरवीरामध्ये मराठा, महार, मुस्लिम, राजपूत, मातंग धनगर, सिख इत्यादी मावळे होते !

मराठा-महार-मुस्लिम खांद्याला खांदा लावून भावाप्रमाणे पेशवाई विरोधात लढले. त्यांची यादी पेरणे कोरेगाव - भीमा येथील विजयस्तंभावरती आहे. त्या ५०० सैनिकांपैकी खंडोजी माळवदकर हे एक शूर मराठा वीर होते. त्यांना ब्रिटिशांनी बक्षीस म्हणून जमीन इनाम दिली, त्यांच्या शेतालगतच हा विजयस्तंभ आहे !

५०० मावळ्यांनी ३०० ब्रिटीशांची मदत घेतली किंबहुना ब्रिटिश आणि पाचशे मावळे एकत्र येऊन पेशव्याविरुद्ध लढले, म्हणून त्यांना देशद्रोही ठरवता येणार नाही, कारण १८१८ साली देश, राष्ट्र ही संकल्पना नव्हती, त्या काळात विविध संस्थाने होती. देश, राष्ट्र ही संकल्पना १९४७- १९५० नंतर आली !

५०० मावळ्यांना देशद्रोही ठरविणार्यांनी टिपू सुलतानविरुद्ध इंग्रजांना मदत करणाऱ्या पेशव्याबद्दल आपले मत स्पष्ट करावे, तसेच पेशव्यांनी १८०२ साली इंग्रजाबरोबर वसईचा तह केला होता व इंग्रजांची तैनाती फौज पदरी बाळगली होती !

छत्रपती प्रतापसिंह महाराजांना कैद करण्यासाठी इंग्रजांना मदत करणाऱ्या व शनिवारवाड्यावरचा जरीपटका खाली उतरवून इंग्रजांचा युनियन जॅक फडकविणाऱ्यानी राष्ट्रवादाच्या व



देशप्रेमाच्या वल्गना करणे हास्यास्पद आहे !

ज्यावेळेस कोरेगाव भीमा येथे युद्ध सुरू होते, तेंव्हा शिवाजीराजांचे अत्यंत तरुण वंशज छत्रपती प्रतापसिंह महाराज व राजपरिवाराला दुसऱ्या बाजीराव पेशव्याने वासोटा किल्यावर नजरकैदेत अर्थात कैदेत ठेवले होते. छत्रपतींना कैदेत टाकणाऱ्या पेशव्याना पराभूत करून त्या पाचशे शुरावीरांनी खरे तर छत्रपतींच्या अपमानाचा बदलाच घेतला. पेशव्यांचा पराभव झाल्यानंतरच प्रतापसिंह महाराजांची सुटका झाली !

एवढे मात्र नक्की की शिवरायांचे पाचशे मावळे जुलमी पेशवाई विरुद्ध खांद्याला खांदा लावून १ जानेवारी १८१८ रोजी लढले व शिवस्वराज्याची वाताहात लावणाऱ्या पेशव्यांना धडा शिकवला, त्यांचा तमाम मराठा, बौद्ध,ओबीसी,एससी,मुस्लिम यांना अभिमान वाटायला हवा !जुलमी पेशव्याविरुद्ध त्यांनी गाजवलेल्या शौर्यामुळे इंग्रजानी पेरणे येथे विजयस्तंभ उभारला. त्यामुळे तमाम बहुजन समाजाला त्या विजय स्तंभा बद्धल अभिमान वाटायला हवा ! त्यामुळे आम्ही १ जानेवारी रोजी कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी येत आहोत !

**आपल्या पूर्वजानी एकोपा जपला, आपणही एकोपा जपूया !**

संदर्भग्रंथ-
१)छत्रपती शिवाजी महाराज-वा सी बेंद्रे
२)छत्रपती संभाजी महाराज-वा सी बेंद्रे
३)नामांतर औरंगाबाद आणि पुण्याचे-शरद पाटील
४)पानिपत १७६१-त्र्यंबक शेजवलकर
५)सातारच्या राज्यक्रान्तिचा इतिहास-प्रबोधनकार ठाकरे
६)दाभाडे घराण्याचा इतिहास-परांडकर
७)महात्मा फुले -धनंजय कीर

**माहिती संकलन :
कमलाकर सोनकांबळे,
संपादक, यश सिध्दी न्युज**



## मा.भवानीसिंह घोरपडे सरकार यांच्या पुढाकारातून टाकळीवाडी गावामध्ये मोफत विमा

टाकळीवाडी/नामदेव निर्मळेः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे गावातील नागरिकांना कोटक महिंद्रा लाईफ इन्शुरन्स या कंपनी चा रु १००००/- हजार चा जीवन विमा समाजसेवक मा.भवानीसिंह घोरपडे यांच्या पुढाकारातून विमा देण्यात आला. नेहमी समाजकार्यात अग्रेसर असणारे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख आहे. वयोमर्यादा १८ ते ५५ वर्ष विमाधारक व्यक्तीला रू १००००/- हजार चा विमा पुढील ५ वर्षासाठी राहील. ४. ५ वर्ष पूर्ण झाल्यावर रू ५२०/- विमाधारक व्यक्तीच्या बँक खात्यात जमा होतील. अशी या विम्याची वैशिष्ट्ये आहेत.वरील योजना टाकळीवाडी गावातील लोकांसाठी पूर्णपणे मोफत आयोजित करण्यात आली . टाकळीवाडीतील असंख्य नागरिकांनी याचा लाभ घेतला. गावामध्ये भवानीसिंह घोरपडे सरकार यांचे कौतुक होत आहे.

## वाळूज येथील आगीच्या दुर्घटनेवर मुख्यमंत्र्यांकडून शोक व्यक्त

मुंबई दिनांक ३१: छत्रपती संभाजीनगरच्या वाळूज औद्योगिक वसाहतीत एका हँडग्लोज बनवणाऱ्या कंपनीस लागलेल्या भीषण आगीच्या दुर्घटनेवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. मध्यरात्री लागलेल्या या आगीत सहा कामगारांचा जळून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या कामगारांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपये देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. याशिवाय जखमी कामगारांना तातडीने शासकीय खर्चाने सर्व वैद्यकीय उपचार द्यावेत अशाही सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. आग शमविण्यासाठी तसेच अडकलेल्यांना सुखरूप काढण्यासाठी करण्यात आलेल्या बचाव कार्याची माहितीही त्यांनी घेतली व हे मदत कार्य व्यवस्थित पार पडण्यास सांगितले.